प्रकरण तिसरे

# 'तुकयाची आवली' कादंबरीचा आशय

## प्रकरण तिसरे

# 'तुकयाची आवली' कादंबरीचा आशय

'तुकयाची आवली' या कादंबरीच्या आशयसूत्राची चर्चा तिसऱ्या प्रकरणात करावयाची असून या चरित्रपर कादंबरीचे वाङ्मयीन स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणात कादंबरीचे कथानक व्यक्तिचित्रणे, घटनाप्रसंग इत्यादी घटकांच्या अनुषंगाने अभ्यास करावयाचा आहे.

आशय म्हणजे कादंबरीचा गाभा होय. कादंबरी उभारणीसाठीच्या रूपबंधात कादंबरीचे कथानक, भाषा, शैली, निवेदन, पात्र चित्रण, प्रसंग, वातावरण इत्यादी महत्त्वाचे घटक असतात. आशयाशिवाय कादंबरी पूर्ण होऊ शकत नाही. आशयसूत्रात पात्र संघर्ष व निर्णयपर शेवट असतो. एकंदरीत कादंबरीचा केंद्रबिंदू म्हणजे आशयसूत्र होय. कादंबरीत एकापेक्षा जास्त आशयसूत्रे असतात.

आशयसूत्राविषयी गंगाधर पाटील म्हणतात, 'आशयसूत्र म्हणजे साहित्यकृतीच्या आशय क्षेत्राचे किंवा अनुभव विश्वाचे केंद्रवर्ती व मध्यवर्ती सूत्र होय.'[१]

आतापर्यंत मराठी साहित्यात अनेक स्त्रिया नावारूपाला आल्या आहेत. उदा. झाशीचीराणी लक्ष्मीबाई, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी यांची जीवन चरित्रे अनेक लेखक, लेखिकांनी विविध अंगानी लिहिली आहेत. परंतु संत साहित्यातील संत तुकाराम यांची पत्नी 'आवली' हिची ओळख म्हणजे एक कजाग, भांडकुदळ स्त्री. अशीच आणि एवढीच ओळख जनसामान्यांपर्यंत आहे. परंतु मंजुश्री गोखले यांनी संशोधनपूर्वक तिची वेगळी ओळख 'तुकयाची आवली' या चरित्रात्मक कादंबरीतून करून दिली आहे.

कादंबरीत आवलीच्या जीवनप्रवासाचा वेध घेताना अनेक घटनाप्रसंगातून तिचे संघर्षमय जीवन चित्रित होते. एका संसारदक्ष, जिद्दी आणि परिस्थितीने घायाळ होऊन धीट बनलेल्या आवलीचे बालपण, विवाह, संसार आणि पतिनिष्ठा यामुळे तुकारामांना मिळालेली तिची साथ आणि त्यामुळे संतपदाला पोहचवून तुकारामांना आकाशाएवढे करण्यात तिचा सहभाग मंजुश्री गोखले प्रभावीपणे अभिव्यक्त करतात.

'तुकयाची आवली' कादंबरीमध्ये आवलीचा जीवनपट रेखाटताना तो एक भाग म्हणून येत नाही.तर तिच्या जीवनचित्रणाचा एक अविभाज्य भाग म्हणून येतो. आवलीचे बालपण सुखाचे आहे. पुण्यातील एक सधन व्यापारी आप्पाजी गुळवे तिचे वडील आहेत. घरात आई व सगुणा नावाची बाई तिचे कोड-कौतुक पूरवितात. घरी दूध, दुभते, बालमैत्रिणी यांची कसलीही उणिव नाही.आवलीला लहानपणापासून विठ्ठल या दैवताबद्दल मनात राग आहे. गावात विठ्ठलाचे मंदिर बांधण्यापेक्षा मंगळाईचे देऊळ बांधावे असे तिला वाटत असते.कारण विठ्ठल भक्तांवर प्रेम करतो हे तिच्या बालबुद्धिला पटत नाही. कारण तिने कथेतून ऐकले होते की, भक्ती करतानाच ज्ञानेश्वरांचा छळ झाला. चोखोबा भिंतीखाली सापडले, गोरोबाचे बाळ मारले गेले. पण वयाने लहान असणारी आवली आपल्या मनातील भावना व्यक्त करू शकत नाही.

विचाराने सर्वांपेक्षा वेगळी असणारी आवली या वयात वैचारिक पातळीची दिसून येते.

'तुकयाची आवली' कादंबरीत येणारी पात्रे आदराने वागणारी, मोठ्याना मान देणारी, त्यांचे विचार प्रमाण मानणारी व्यक्तिमत्त्व आहेत. पोटा-पाण्यासाठी पडेल ती कामे करणारी आहेत. या लोकांना एकमेकांविषयी जिव्हाळा आहे. लेखिकेने निरनिराळ्या घटनाप्रसंगातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे.

कादंबरीत विवाहाची पद्धत बाल-जरठ विवाहाची आहे.असे दिसून येते. केवळ आठ वर्षे वयाच्या आवलीचे लग्न एक मुल व पत्नी असणाऱ्या तुकारामांशी होते. तुकाराम हे देहूतील बोल्होबा आंबिले-मोरे यांचे तृतीय पुत्र आहेत. समाजात पुरुषप्रधान संस्कृती असल्याने पुरुषांच्या विचाराना प्राधान्य आहे. विवाहाच्या पूर्वी वराचे घर पहाणे, पाहुणचार करणे, विवाह सोहळा नवऱ्याच्या घरी मोठ्या धामधुमीत होताना दिसतो.

आवली-तुकाराम यांच्या विवाहाने दोघांच्याही जीवनाला एक वेगळी कलाटणी लागली आहे. लेखिकेने कादंबरीच्या प्रत्येक प्रकरणात विठ्ठल - रूक्मिणीचे देवत्वरूप विसरून मनुष्यत्त्व रूप दिले आहे. आपल्या भक्तीमध्ये गुंतलेल्या तुकारामांना संतपदाला पोहचवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या विवाहाने हेच साधलेले दिसते. एका मुलाची, आजारी पत्नीची, जबाबदारी, त्यातच नव्या संसाराची जबाबदारी तुकारामांवर आली होती. पण

आवलीच्या जीवनप्रवेशाने तुकारामांच्या विठ्ठलभक्तीच्या इमारतीची आधारशिला बनते. ती या विवाहाने 'आवली ऊर्फ जिजा' या नावाने ओळखली जाते.

त्यावेळच्या रितिप्रमाणे मुलगी वयात येईपर्यंत आई-वडिलांच्या घरी ठेवली जाते. पण केवळ पाच दिवस तिला वराच्या घरी रहावे लागते. पण हे पाच दिवस राहण्यासाठीही आवली आढेवेढे घेते. आप्पाजीनाही तिला सोडून पुण्याला जाताना दु:ख होते. आयुष्याच निधान असलेल्या आवलीला सोडताना आईच दु:ख काळीज हेलावणारे आहे. तर सगुणालाही अश्रु अनावर होताना दिसतात.

आवलीसारखी सून तुकारामांचा संसार सांभाळण्यास समर्थ आहे. या विचाराने बोल्होबा व कनकाईला खूप आनंद होतो. आवली वयात येतात. तिला सासरी आणली जाते. आवली- तुकारामांचा संसार काही दिवस खूप आनंदात चालतो,पण नियतीच्या मनात वेगळाच डाव आहे.

वार्धक्याने बोल्होबांच्या मृत्यू होतो. आवली बोल्होबांना आप्पाजींच्या रूपात पहात होती. पण या घटनेने आवलीला खूप दु:ख होते. तर तुकारामांच्या मनावर आघात होतो. कनकाई सैरभैर होते आणि थोड्याच दिवसात ती सुद्धा पतीच्या वाटेने निघून जाते. तुकारामांचा वडिलभाऊ सावजी संसारातून विरक्त झाला होता. त्यांची पत्नीही मरण पावते. या आणि अशा विविध प्रकारच्या दु:खद घटनांचे आघात सहन करणे आवली - तुकारामांना खूप जड जाते. पण थोड्या दिवसांनी दु:खाचा भार हलका होतो. दु:खातून थोडे सावरतात. त्यांना एक मुलगी होते. तिचे नाव काशी असे ठेवतात. काशी वर्षाची होण्याच्या आत महादेव व त्याच्या पाठोपाठ गंगा अशी मुले होतात. पण हे सुख व आनंद फार काळ टिकत नाही. दरम्यानच्या काळात तुकारामांची पहिली बायको रूक्मिणी हिचा मृत्यू होतो. रूक्मिणीच्या मृत्यूने आवलीला खूप दु:ख होते. कारण तिचे अस्तित्व हे आवलीच्या दिवसभराच्या कामाचा नि:शब्द पुरावा असतो. या घटनेनेही तुकाराम पूरते घायाळ, हतबल होतात.

जेव्हा-जेव्हा तुकाराम संकटाने हतबल होऊन निराश होतात त्या त्या वेळी आवली अधिक जिद्दीने संकटाला सामोरी जाताना दिसते. ती यावेळेसही तुकारामांना सावरते.

पण इश्वरी इच्छा वेगळी आहे. तुकारामांना असे सबल करून संसारात गुंतवले तर ते अशाने संतपदाला पोहचणार नाहीत. म्हणूनच की काय असे वेगवेगळे घटना प्रसंग घडताना



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

दिसतात. यावेळी आलेले संकट एकट्या आवली तुकारामांवर आलेले नाही. हे संकट संपूर्ण महाराष्ट्रात आलेले आहे. त्यावेळी महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. गाई, गुरे चाऱ्या पाण्याशिवाय मरत होती, माणसे अन्न अन्न करून तडफडत होती. तुकारामांनी लोकांना यापूर्वी सुपाने धान्य वाटले होते. पण त्याच तुकारामांवर इतरांकडून पसाभर मागून आणण्याची वेळ येते आणि भरीस भर म्हणजे तुकारामांचा मुलगा संताजी या दुष्काळाचा बळी ठरला. या धक्क्याने तुकाराम पुरते कोलमडून जातात. त्यांची जगण्याची इच्छा संपते. संसार असार वाटू लागतो. त्यांना नामस्मरणाची ओढ लागते. ते आवली, मुले, संसार यांच्या पासून लांब जाण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी स्वत:ला भजन, चिंतन, मनन यात झोकून देतात.

परंतु आवली मात्र आपल्या संसारातील संकटाच्या गहिऱ्या ज्वाला गिळताना दिसते. निराश, हतबल तुकारामांना वेळोवेळी संकटातून बाहेर काढताना दिसते. केवळ मुले संसार यांच्यासाठी त्यांच्या नाकर्तेपणाला, थंडपणाला कठोरपणे बोलताना दिसते. पण तुकारामांवर तिचे जिवापाड प्रेम आहे. ती त्यांच्यासाठी कुठेही कमी पडताना दिसत नाही. पण विठ्ठल भक्तीला तिचा विरोध आहे. शरीराने, मनाने कोसळलेले तुकाराम विठ्ठलभक्तीत झुकतात. येथे दोघांची जीवनध्येये परस्पर विरोधी असल्याचे दिसून येते.

कादंबरीत आवली पदोपदी देवभोळ्या तुकारामांना कृतिशील बनविण्याचा प्रयत्न करते. ती एक संसारदक्ष अशी पत्नी आहे. विठ्ठलाच्या भक्तीत रममाण झाल्याने तुकारामांचे संसारातून लक्ष उडाले आहे. त्यामुळेच घराचे, व्यापाराचे नुकसान झाले आहे. असा तिचा समज होतो. तुकाराम यावेळी आपल्या कुटुंबाच्या दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करतात. आवली याची चौकशी जास्त खोलात जाऊन करीत नाही. मात्र परिणाम वेगळाच होतो. तुकाराम जे धान्य आणित होते ते लालजी सावकाराकडून वाड्याच्या किंमतीच्या बदल्यात आणित होते आणि ती रक्कम पूर्ण झाल्यावर सावकार वाड्यावर जप्ती घेऊन येतो. आपला वाडा जाणार या कल्पनेने तिच्या मनावर प्रचंड ताण येतो. आपल्या मुलांवरील छत्र जाणार म्हणून सावकराला अदातदा बोलते तुकाराम यावर काहीतरी तोडगा काढतील अशी तिची अपेक्षा असते पण ही अपेक्षा फोल ठरते. तुकाराम आवलीला आपल्या वस्तू बाहेर घेण्यास सांगतात तर आवली तुकारामांना आपली कर्तव्य व जबाबदारी यांची जाणीव करून देते. पण स्थितप्रज्ञ तुकाराम आवलीची समजूत काढतात व वाड्याबाहेर पडतात. इथे आवलीची

भूमिका हिंदू प्रतिव्रते प्रमाणेच आहे. तिची व्यथा, आगतिकता, कुंचबणा सुक्ष्मपण रेखाटताना लेखिकेने आवली तुकारामांचे वास्तव जीवन चित्रण घडविले आहे.

तुकारामांचा वाडा सावकाराकडे गहाण गेल्यानंतर संपूर्ण गाव तुकारामांच्या मदतीला येतो. कारण तुकारामांनी आपली परमार्थ साधना कवित्व, साधुत्व, सुचित्व, निश्चय, भक्तीची ओढ इत्यादीच्या माध्यमातून गावला आपलेसे केलेले आहे. ही कृपा विठ्ठलाची असली तरी हे श्रेय आवली विठ्ठलाला न देता तुकारामांनादेते. पण तिच्या मनाला गावाने केलेल्या मदतीमुळे वेदना होतात. कारण संपूर्ण गावाला मदत करण्याची कुवत असणाऱ्या आंबिले घराण्याला गावानेच मदत करण्याची वेळ यावी. असे तिला वाटते. कादंबरीत या ठिकाणी आवली-तुकारामांचे घडत-बिघडत जाणारे जीवन रेखाटले आहे. तुकारामांचे विठ्ठलाकडे अधिक झुकणे संसाराची वाताहत होणे असे विविध टप्पे चित्रित होतात.

एके दिवशी पहाटे अचानक तुकाराम घरी नाहीत हे पाहून आवली सैरभैर होते. माणकू तुकारामबुवा भागनाथाच्या डोंगराच्या दिशेने गेल्याचे सांगतो. आवली डोंगराकडे धाव घेते.जाताना त्यांच्यासाठी भाकरी घेऊन जाते. काट्यातून वाट काढीत ती त्यांना शोधते व घरी आणते. तुकारामांना विठ्ठलाच्या भक्तीसाठी एकांत हवा असतो. पण आवलीच्या समजूती खातर ते घरी येतात.

दरम्यानच्या काळात एके दिवशी आप्पाजी आवलीला भेटायला येतात. परंतु तुकारामांच्या कुटुंबाची इतकी वाताहत झाली असेल, इतक्या दु:खद घटना घडल्या असतील, भयंकर दुष्काळाचे परिणाम आवली-तुकारामांना भोगावे लागले असतील याची कल्पनाही त्यांना आलेली नव्हती. त्यामुळे आपल्या आवलीची केविलवाणी अवस्था पाहून त्यांना अपार दु:ख होते. पण आवलीखातर आपले अश्रु लपवितात. कारण कणखर आवली खचू नये असे त्यांना पण वाटते. ते तुकारामांकडे आवलीला चार दिवस गावी नेण्याची परवानगी मागतात. तुकारामांची काहीच हरकत नाही. पण आवली जात नाही. कारण आपल्या माहेरी जाण्याने तुकारामांना भक्तीचे वेड अधिकच लागून ते गोसावीच होतील असे तिला वाटत असते.

आप्पाजी तुकारामांना संसार सांभाळून इश्वरभक्ती कशी करावी याविषयी आपल्या अधिकार वाणीने समजूत काढतात. ते तुकारामांनाही पटते. ते यापुढे आपण संसारात लक्ष

घालू असे आप्पाजींना वचन देतात. आवलीला खूप आनंद होतो. तिच्या अपेक्षा सर्वसामान्य स्त्रीप्रमाणे आहेत. आता आपला संसार सुखात चालेल अशी आशा वाटते.

तुकाराम गावात बाळाजी सावकराकडे काम मागावयास जातात. तुकारामांसारखी पापभीरू व्यक्ती आपल्या शेतातवर कामाला येते आता आपल्या शेतातील पिकाची कसलीही काळजी नाही. म्हणून बाळाजी तुकारामांना शेत राखणीचे काम देतात. तुकाराम शेतावर जातात पण शेत राखताना ते ध्यानमग्न होतात. विठ्ठलाच्या नामस्मरणात तल्लीन होतात. भजनात दंग असताना जनावरे शेतातील पीक तुडवून टाकतात. संपूर्ण पीक जमिनदोस्त होते. ही बातमी बाळाजी सावकार व पंचाकडे जाते. तेव्हा बाळाजीची नुकसान भरपाई तुकारामांनी द्यावी असा निर्णय होतो. ही बातमी आवलीला समजते. तेव्हा ती आपल्याच नशिबाला दोष देऊन रडू लागते. पण हळहळणारे लोक पाहून तिला राग येतो.

आवलीला कुणाचीही सहानुभूती नको असते. ती एका प्रसंगात म्हणते, ''चलाऽऽ चला इथनं, इथं काय तमाशा मांडलाय काय? कोडगे मेले. नुसतं दुसऱ्याची मजा बघायला पाहिजे. चला चालते व्हा. आमच आम्ही बघून घेऊ काही नको चुकचुकायला मी मस्त समर्थ हाय. माझ्या नवऱ्याची, संसाराची आणि पोराबाळांची काळजी करायला चला चालायला लागा. असू दे माझा नवरा येडा. पण तो माझा नवरा आहे. या आवलीचा मी आणि तो काय ते बघून घेऊ कुणाला मधे पडायचे कारण नाही.जमले सगळे टोची मारायला पण जोवर ही आवली जिवंत आहे तोवर माझ्या संसारावर मी कुणालाही टोची मारू देणार नाही. सांगून ठेवते.'' [२]

आवली आलेल्या सर्व संकटाना निर्भयपणे निर्धाराने तोंड देताना दिसते.तसेच एक स्त्री, एक पत्नी, एक आई म्हणून कर्तव्य बजावताना दिसते. एकीकडे पतीची बाजू घेताना बाळाजीच्या पिकाचे नुकसान कसे द्यायचे याचीही काळजी आहे. तुकाराम मात्र पाडुरंगावर विश्वास ठेऊन आहेत. पण चत्मत्कार व्हावा अशी घटना घडते. पिकाची कापणी होऊन नेहमीपेक्षा धान्य जास्त होते. मात्र हे जादा धान्य बाळाजीच तुकारामांना देण्याचे ठरवितात. या घटनेने तुकाराम विठ्ठलाकडे अधिकच ओढले जातात. तर आवली ही सर्व कृपा त्या मंगळाईची आहे असे मानते. तुकारामांचा विठ्ठलावरील अढळ विश्वास तर आवलीच्या या

विठ्ठलाच्या वेडापायी तुकारामांचे संसारातून लक्ष निघून संसाराचे वाटोळे झाले हा विश्वास दोघांतही घट्ट आहे. हा विश्वास आणखी दृढ होण्यासाठी अशा वारंवार घटना घडत राहतात.

एके दिवशी आवलीचा मुलगा म्हादया तापाने खूप आजारी पडतो. ती भिकंभट वैद्याकडून औषधाची मात्रा देते, गार पाण्याच्या पट्ट्या ठेवते. पण ताप उतरत नाही. दरम्यान तुकाराम घरी नसताना ते त्यावेळी डोंगराच्या पलिकडे गेले होते. तेथे त्यांना त्यांचे गुरू भेटले. तुकाराम आनंदात असतात तेव्हा आवलीला एक बाप असून त्यांना कर्तव्याची जाणीव नाही म्हणून त्रागा करते, चिडते, तुकारामांना दोष देते व ज्याच्यामुळे आपल्या नवऱ्याला भक्तीचा नाद लागला त्या विठ्ठलालाच चपलीन मारून काढण्यासाठी आजारी म्हादाला फरपटत ओढत बाहेर पडते आणि मंदिरात जाते तिचा क्रोधित अवतार गावातील सर्व लोक पहात असतात. ती रागाने विठ्ठलाला तुटक्या चपलीने मारणार इतक्यात म्हादया तिच्या पायाला मिठी मारतो व म्हणतो आई मला बरं वाटतयं हे ऐकून ती थबकते व भानावर येते. हातातील चप्पल आपोआप गळून पडते आणि आवली वाऱ्यासारखी घरी येते. तिच्यातिल संतापलेली आई शांत होते.

म्हादयाचे आजारपण, घरातील कामे यातून आवली स्थिरस्थावर होते.पण तुकारामांच्या संदर्भात गावात होणारी चर्चा ऐकायला मिळते. ती म्हणजे तुकारामांवर ब्राह्मण लोक नाराज आहेत. कारण वेदांचे पठण, अध्ययन, अध्यापन करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण लोकांना आहे. वेदातील ज्ञान तेच घेऊ शकतात पण हा कायदा तुकारामांनी मोडला आहे. वेदातील ज्ञान ते आपल्या भजन किर्तनाच्या माध्यमातून सामान्य लोकांना देतात. ही बाब त्यांना पटत नाही. म्हणून काशीचे रामेश्वर भट याचा जाब विचारायला व न्यायनिवाडा करण्यासाठी देहूला येतो. न्याय निवड्यात तुकारामांच्या पोथ्या पाण्यात सोडाव्यात असा आदेश मिळतो. या पोथ्या मागण्यासाठी गावातील लोक तुकारामांच्या घरी येतात पण आवली त्या देण्यास नकार देते. कारण त्या पोथ्या तुकारामांनी संसाराकडे दुर्लक्ष करून प्रसंगी उपाशीपोटी राहून रात्रंदिवस लिहिल्या आहेत. त्या पाण्यात सोडण्यासाठी नाहीत असा सवाल आवली करते व आलेल्या लोकांना परत पाठविते. पण या पोथ्या स्वत: तुकारामांनी आण्याव्यात असे त्यांना सांगितले जाते. तुकाराम जड पावलाने पोथ्या आणतात व रामेश्वर भटाकडून त्या पोथ्या इंद्रायणी नदीत सोडल्या जातात. येथे संघर्ष सुरू होतो तो तुकारामांच्या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विश्वासाचा, श्रद्धेचा, भक्तीचा आणि समाजाच्या परंपराचा, पुरोगामीपणाचा, ब्राह्मणशाहीचा या संघर्षात आवलीची कुतरओढ होते. तुकाराम भ्रमिष्ट होऊन बसतात. पण वीस दिवसांनी तुकारामांच्या पोथ्या एका गुरवाच्या मुलास सापडतात. त्या नदीत झाडाला तटून बसतात. आवलीला खूप आनंद होतो हा आवलीचा आनंद तुकाराम पहातात. आवलीच्या भाबड्या स्वभावाबद्दल गहिवरतात.

गावातील लोक तुकारामांच्या पोथ्या पालखीत घालून मिरवणूक काढतात. त्यावेळी रामेश्वर भटाच्या अंगाचा दाह होतो. तेव्हा तुकाराम त्याच्या अंगाला इंद्रायणीतील ओली माती लावतात. तेव्हा रामेश्वरभटाचा दाह कमी होतो. तो तुकारामांच्या पायावर आपले मस्तक ठेवतो व ज्या पाखलीत पोथ्या ठेवल्या आहेत त्या पालखीला स्वत: खांदा देतो. येथे तुकारामांची योग्यता गावालाच काय तर कट्टर धर्ममार्तंडांनाही कळली होती आणि आवलीला अभिमान वाटला होता. तिच्या डोळ्यात अश्रु येतात पण ते आनंदाचे असले तरी त्याला दु:खाची किनार आहे. कारण तुकाराम आपल्या भक्तीने विठ्ठलाच्या जवळ जाण्याची एक पायरी वर चढले होते. साधकावस्थेतून सिद्धावस्थेकडे जात होते.

तुकाराम आपल्या भक्तीने संत श्रेष्ठ ठरले पण आवलीची वणवण थांबत नाही. चार मुलं घेऊन आवली संसार करते. तुकारामांना सावरते. तरीही त्यांचे लक्ष नाही. म्हणूनच आवली संताप,त्रागा, बडबड करते, करवादते. पण आवलीची भावना कोणी जाणू शकत नाहीत. उलट आवलीच्याच त्रासाने तुकारामांचे लक्ष संसारातून उडाले. ती भांडखोर, कर्कशा आहे असा समज होता. पण तिची गृहदक्षता, संसारओढ, तिची राबणूक, तुकारामांवरची माया संसारातील तुकारामांची उदासिनता कोणी जाणत नाहीत. तिच्या विषयीचा गैरसमज लोकांच्यामध्ये पसरताना दिसतो. त्यातच भर म्हणून एक काशीबाई नावाची स्त्री तुकारामांनी भजनात सांगितलेला अभंग आवलीला येऊंन सांगते. अभंगात ते आवलीला कर्कशा म्हणतात हे पाहून तिच्या काळजावर ओरखडे उठतात. कारण तुकारामांच्या मते, आवलीमुळे आपण संतपदाला पोहोचलो असे सांगणारे तुकाराम बाहेर आपल्या विषयी अभंगातून असे बोलतात याबद्दल ती विचारात पडते आणि यावर ती तुकारामांकडे काहीच बोलत नाही. कारण लोकांनी पून्हा एकदा कर्कशा, कजाग ठरविले असते.

शिवाजी महाराज व तुकाराम या दोन विभूती समकक्ष आहेत. तुकारामांची ख्याती शिवाजी महाराजांना माहित होते. ते तुकारामांना भेटण्यासाठी येतात. येताना त्यांच्या कुटुंबासाठी सोन्या-मोत्याचे दागिने, सोन्या-चांदीचे रुपये, रेशमी वस्त्रे यांचा नजराणा आणतात. आवली त्यांचे आपल्या परिस्थितीच्या मानाने स्वागत करते. शिवाजी महाराज आवलीच्या गोधडीचे, तिच्या कलाकुसरीचे कौतुक करतात व आपण आणलेला नजराणा भेट म्हणून देतात. पण तुकाराम त्या नजराण्यातील धन हे आपले नाही ते रयतेचे आहे. त्याचा उपयोग लोककल्याणासाठी करा. असा संदेश शिवाजी महाराजांना देतात व ते धन आवलीला परत करावयास सांगतात. शिवाजी महाराज तुकारामांच्या विचाराने भारावून जाऊन त्यांची क्षमा मागतात. तर आवलीही पतीची इच्छा हेच माझे दागिने असे महाराजांना सांगते. तेव्हा महाराज आवलीसमोर नतमस्तक होतात.

शिवाजी महाराज निघून गेल्यानंतर संमजस स्थितप्रज्ञ तुकाराम आवलीची समजूत काढतात. पण आवली तुकारामांच्या अभंगातील दाखले तुकारामांना सांगते की, संसार नेटका करावा. मग तुम्ही का करीत नाही. संसार दोघांचा असतो. तो दोघांनी करावा. एकाने करावा दुसऱ्याने तोडावा असा नसतो. असे म्हणून आत्महत्या करण्यास जाते. पण ती आत्महत्या करीत नाही ती भानावर येते. कारण तिच्या लहानपणी एका साधूने तिची भविष्यवाणी वर्तविली होती ती तिला आठवते. तिला आप्पाजी आठवतात. आई आठवते. तिच्या भविष्यवाणीत सांगितले होते की, तिला अपार कष्ट सोसावे लागतील, ती तेज आहे, वटवृक्षाला आधार देणारी धरणी आहे, तिचं कुंकू मोठ आहे, भाग्याच आहे. प्रत्यक्ष परमेश्वरावर हिची सत्ता राहिल. हिची पुण्याई मोठी आहे. ती संकटाना भीक घालणार नाही. मराठी मुलूख हिचा ऋणी राहील आणि इतिहास हिला विसरणार नाही.

आप्पाजी आवलीच्या बाबतील आपल्या बायकोला म्हणतात, 'माझी आवली गप्प बसणारी, मुळूमुळू रडणारी नाही ती संकटाला तोंड देणारी आहे तर, आवलीची आई म्हणते, आवली लुटुपुटु चा संसार चांगला करते मग खरा संसार किती चांगला करेल.'

आवली आपल्या संसारात किंबहुना तुकारामांच्या संसारात असणे किती महत्त्वाचे आहे. याची जाणीव होते. ती आतापर्यंत आप्पाजींची आवली होती. पण संतपदाला

पोहोचणाऱ्या तुकारामांची आवली बनण्याची आस लागते. ती केवळ संसार, पती मुले यांच्या काळजीने घरी परत येते.

आत्महत्या करावयास गेलेल्या आणि संसार, कर्तव्य यासाठी परत आलेल्या आवलीला पाहून तुकाराम तिची अनेक रूपे आठवून व्याकूळ होतात. पण लगेच विठ्ठल भक्तीत गुंगून जातात. पांडुरंग आपल्या जीवनाच निधान आहे. याची त्यांना आठवण होते. आवलीला आपली मुले लिहायला, वाचायला शिकावी, त्यांना व्यवहार कळावा यासाठी मुलांना शिकवा असा तगादा लावते. पण तुकाराम आपण फार दिवस मुलांना लाभणार नाही असे निर्वाणीचे सांगतात. ते गावातील लोकांबरोबर भजन करतात हे पाहून आवली चिडते व त्यांच्या टाळ-चिपळ्या फेकून देते. यापेक्षा मुला-बाळांना अंगाखांद्यावर घ्या, असे म्हणते. पण तुकाराम टाळ, चिपळ्या आपला वारसा असल्याचे सांगतात.

कालांतराने तुकाराम आणि आवली यांच्यातील संभाषण कमी होते. तुकारामांचे चित्त शांत होते त्याची तगमग, तळमळ संपते हे पाहून तुकाराम वेडे होतात की काय अशी शंका येते. कारण तुकाराम आवलीशी, मुलांशी न बोलता पांडुरंगाशीच बोलतात. आवलीने आपल्या लहानपणी एक वेडा असंबंध बडबडताना पाहिलेला होता. तो एक दिवस मरतो. तुकारामांची अवस्था त्याच्याप्रमाणे तिला वाटू लागते. तुकारामांचे भक्तीचे वेड लागून मानवी अस्तित्व कमी होताना दिसते. तुकाराम आपले इथले कर्तव्य संपल्याचे आवलीला सांगतात. पण आवली त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देते.

तुकाराम महाराज समाधीस्थ अवस्थेत विठ्ठलांशी बोलतात, हसतात, नाचतात हे पाहून आवली म्हाद्याला तुकारामांसाठी भिकं-भटांकडून मात्रा आणायला पाठवते. पण भिकभट समजूत घालून तुकारामांची महती सांगतात. हे पाहून तुकारामाने साऱ्या गावाला वेड लावले आहे असे म्हणते.

रात्रंदिवस भजन करणाऱ्या तुकारामांच्या चिपळ्या गोठ्यात भिरकावून देते. तेव्हा तुकाराम निर्जीव चिपळ्या आपल्याकडे काही मागत नाहीत. पण त्या जेव्हा माझ्या शरीरापासून वेगळ्या असतील तेव्हा मी या जगात नसेन हे शब्द ऐकून आवली गहिवरते व संतापतेही वेळोवेळी तुकारामांना संसाराच्या बहुपाशात ओढणारी, संसारदक्ष आवली हताश होते. तिला

एक अनामिक भीती वाटते ती तुकारामांना कधी एकटे सोडत नाही. ती त्यांना लांबून पहाते. त्यांची सावली बनून राहण्याचा प्रयत्न करते.

तुकाराम आपण पंढरपूरला जात असल्याचे आवलीला सांगतात. याला आवलीचा विरोध होतो. कारण त्यांच्या भक्तिने वेडे झालेले लोक संसारात रमत नाहीत हे ती जाणून होती पण तुकाराम नक्की परत येण्याचे आश्वासन आवलीला देतात व पंढरपूरला जातात. मागे आवली खूप आजारी पडते. पण 'पंढरीनाथ यादव' नावाचा एक मुलगा आवलीच्या घरी येऊन तिच्या आजारपणात तिची सेवा करतो. त्यावेळी तुकारामांना पंढरपुरात विठ्ठल मूर्तीत विठ्ठल दिसत नाही. ती मूर्ती निर्जिव वाटते. तुकाराम घरी येतात व झाला प्रकार आवलीला सांगतात. तर आवलीची मुले आवलीचे आजारपण व सेवा करायला आलेल्या पंढरीनाथ याविषयी माहिती देतात. तुकाराम अश्रू ढाळतात. त्यांना समजते की, प्रत्यक्ष विठ्ठलच पंढरीनाथाच्या रूपात हिची सेवा करायला आला आणि आवली मात्र नेहमीच त्याला शिव्याशाप देते. आपण संसार सोडून परमार्थ साधताना माझ्या आवलीचा संसार सांभाळणाऱ्या विठ्ठलाचे ते आभार मानतात.

तुकारामांना पंढरपुरात प्रत्यक्ष दर्शन झाले नाही. म्हणून खूप उदास होतात. आवली त्यांची अनेक प्रकारे समजूत काढते. पण आपण त्याला भेटायला गेले पाहिजे असे निर्वाणीचे बोलतात. तु ही माझ्याबरोबर चल असे बोलतात. पण संसाराच्या पाशात गुंतलेली आवली नकार देताना दिसते.

तुकाराम आपण भजन करण्यासाठी जातो असे सांगून जातात. पण जाताना आपण कायमचे जात आहोत असे सांगतात एरवी नेहमी असेच तुकाराम म्हणतात म्हणून ती त्याकडे दुर्लक्ष करते व आपण नंतर येण्याचे सांगून होळीच्या सणादिवशी मुलांसाठी पुरण-पोळ्या करते व थकलेली आवली दुपारी थोडी विसावते. तिला झोप लागते. झोपेत ती एक स्वप्न पहाते. स्वप्नात गरूडाच्या पाठीवर पंख असलेली कमान आहे. त्या कमानीत बसून तुकारामउंच आकाशात गेले. कधीही परत न येण्यासाठी हे भयंकर स्वप्न पहाते. तिला त्या स्वप्नाचा, त्या घटनेचा अर्थ कळतो. ती दचकून जागी होते बाहेर त्यांच्या खोलीत शोधते. तेव्हा त्यांच्या चिपळ्या दिसतात. पाठोपाठ तुकारामांचे निर्वाणीचे शब्द आठवतात. ते कटू असले तरी सत्य होते. तिचे काळीज चरकते. ती आकांताने टाहो फोडते. तुकारामांच्या

जाण्याचे आवलींचे सर्वस्व हरपते. तिचं जगण्याच निधान संपतं. ती एकाकी होते. तुकयाची हरलेली, संघर्ष संपलेली आवली भ्रमिष्ठ होऊन राहते. या अवस्थेत तिची मुले आवलीची देखभाल करतात. ती काही दिवसांनी सावरते. आपल्या अशा अवस्थेत मुलांचे काय झाले असेल याची ती पुन्हा काळजी करताना दिसते. ती कंबर कसून मुलांना सांभाळते. मात्र ती यावेळी एक करते, ती आपली कामे आटोपून विठ्ठलाच्या देवळात जाऊन बसते.कारण तुकाराम निश्चितच विठ्ठलाला भेटायला येतील व आपल्यालाही भेटतील आपल्या भक्तीने पावन झालेले तुकाराम एक महान संत आकाशाएवढे बनलेले मात्र आपण आहे तेवढीच, तेथेच राहिलेली आवली एक वेगळी आशा घेऊन जगताना दिसते.

काही दिवस गेल्यानंतर एके दिवशी विठ्ठलाच्या मंदिरात मूर्तीत तिला तुकाराम महाराज दिसतात. आवली त्यांना साद घालते तुकारामांच्या जाण्यान आपलं जगण व लोकांच वागण सांगताना दिसते. आता मला सोडून पुन्हा जाऊ नका, आपण तुमच्या चिपळ्या व टाळ जिवापाड जपून ठेवल्याचे सांगते तुम्ही गेल्यापासून अनेकांना तुमचा पत्ता विचारला पण कोणीचं नीट सांगेना. आपण मरण येत नाही म्हणून जगले असल्याचे सांगते तिचं दु:ख तिच्या सांगण्यातून धो-धो वाहताना दिसतं.

तुकाराम आवलीची अवस्था पाहून आपण तुला न्यावयास आलो असल्याचे सांगताता. आपण तुझ्यावर फार मोठा अन्याय केला आहे. तुझ्यासारखी धरणी होती म्हणून मी आकाशाएवढा झाल्याचे कबुली देतात व तिची हात हातात घेऊन चालू लागतात.आवलीला तुकारामांच्या समवेत सप्तपदी चालत असल्याचा भास होतो. आज ती एकटी, एकाकी नसून ती केवळ तुकयाची आणि तुकयाची आवली बनून रहाते.

**समारोप**

उपरोक्त विवेचनावरून असे म्हणता येईल की, 'आवली' संत तुकारामांच्या अणूएवढ्या रूपापासून ते आकाशाएवढ्या कर्तृत्वापर्यंत प्रत्येक क्षणात, प्रत्येक संकटात आणि परिवर्तनात भागीदार आहे. म्हणूनच तुकाराम निश्चितपणे विठ्ठलभक्ती करू शकले.तिची प्रतिमा भारतीय हिंदू पतिव्रतेची आहे. संतपदाच्या वाटचालीत तुकाराम संत शिरोमणी पदाला पोहोचलेले मात्र संसारात तिने घेतलेली झुंज, केलेला संघर्ष, अवहेलना, उपेक्षा वाट्याला येताना दिसतात. आपल्या नवऱ्यानं विठ्ठलाचा नाद सोडवा आणि


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मुलांबाळाकडे बघावं ही माफक अपेक्षा पण तीही भंग होताना दिसते. मुले संसार यासाठी विद्ध पक्षिणी सारखी घायाळ होताना दिसते.

**कथानक**

कथानक हा कथात्म तसेच नाट्यात्म साहित्याचा एक महत्त्वाचा घटक असतो. 'कथानक हे विविध घटकांनी मिळून बनलेले असते. कथानकामधून निवेदक कादंबरीतील व्यक्तींचे वागणे त्यांच्या कृती सांगत असतो.कथानकात संघर्ष असतो. कथानक हे व्यक्ती आणि त्याचे भावजीवन यावर भाष्य करीत असते. घटना प्रसंग आणि व्यक्ती हे घटक परस्परांशी अतूट असा संबंध प्रस्थापित करून ते कथासूत्राला अपरिहार्यपणे पुढे खेचीत असते.' कधी कधी कथानकाला जोडून उपकथानकेही येतात. त्यामुळे मुख्य कथानकाला उठावदारपणा प्राप्त होतो. 'कथानक म्हणजे कादंबरीकाराने केलेली व्यक्तिंची कृतींची, प्रसंगाची घटनांची जुळणी'[३]

'तुकयाची आवली' या चरित्रात्मक कादंबरीमध्ये संत तुकाराम यांची पत्नी आवली हिचा जीवनसंघर्ष चित्रित झालेला आहे. आवलीच्या लहानपणापासून ते तिच्या मृत्यू पर्यंतच्या सर्व घटना प्रसंगाचा आढावा प्रस्तुत कादंबरीतून साकार होतो.

आवली ही पुण्यातील श्रीमंत सधन व्यापारी आप्पाजी गुळवे यांची एकुलती एक मुलगी आहे. ती हुशार सालस अशी सर्वगुणसंपन्न आहे. मात्र विठ्ठल या दैवताविषयी तिला राग आहे. कारण विठ्ठल हा आपल्या भक्तांना भक्तीचे वेड लावतो व भरल्या संसारातून उठवितो असे तिला वाटते. ती विठ्ठलाचे गावात मंदिर बांधण्यासाठी विरोध करताना दिसते.

आवलीचे वय केवळ आठ वर्षांचे असताना तिचे वडील आप्पाजी हे देहूतील बोल्होबा आंबिले-मोरे यांचा तृतीय मुलगा तुकाराम यांच्याशी विवाह करतात. त्यावेळच्या पद्धतीनुसार वयाने लहान असणारी आवली वयात आल्यावर सासरी जाते. लहान असूनही फार थोड्या दिवसात आवली आपले घर संसार यांच्या जबाबदारीचा वसा घेते.

तुकारामांचा संसार समर्थपणे सांभाळणारी सून मिळाल्यामुळे बोल्होबा व कनकाई यांना खूप आनंद होतो. धन्य वाटते. परंतु फार थोड्याच दिवसात बोल्होबा व कनकाई यांचा पाठोपाठ मृत्यु होतो. तसेच तुकारामांचा थोरला भाऊ सावजी परागंदा होतो. त्याची पत्नी ही

मरण पावते. या घटनांनी पापभीरू तुकाराम सर्वसामान्य माणसाप्रमाणेच खचून जातात आणि येथेच त्यांच्या आयुष्याला अनपेक्षित कलाटणी मिळते. दैनंदिन जीवनातील जीवघेणा संघर्ष आणि झालेला पराभव यामुळे खचलेल्या तुकारामांना आवली डोंगराप्रमाणे आधार देताना दिसते. ती खंबीरपणे त्यांना साथ देण्याचा प्रयत्न करते. दरम्यानच्या काळात त्यांना तीन मुले होतात. त्यांची पहिली पत्नी जिजाबाई व मुलगा संताजी यांचीही जबाबदारी आहे. पण संकटे ही त्यांच्या जीवनात हातात हात घालून येताना दिसतात.

महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ त्यामुळे असंख्य माणसे गुरे-ढोरे अन्नपाण्यावाचून मरतात. त्यावेळी ते हवालदिल झाले. लोकांजवळ स्वत:ला खाण्यालाच अन्न नाही तर त्यांची सावकारी कशी चालणार आणि एकेकाळी सधन असणाऱ्या तुकारामांचे जीवन हादरून जाते. त्यांचा लाडका मुलगा संताजी या दुष्काळाचा बळी ठरतो. दरम्यान पत्नीच्या औषधोपचाराकडे दुर्लक्ष झाल्याने तिचा दम्याचा विकार वाढतो. ती या जगाचा निरोप घेते. या घटनेने तुकाराम पूर्णपणे उन्मळून पडतात. माणसात असूनही एकटे, एकाकी होतात. त्यांना दु:ख हे दु:ख वाटत नाही. संसार असार वाटतो. ते पूर्णपणे लौकिकाकडे पाठ फिरवतात आणि याचवेळी आवलीच्या जीवघेण्या जीवनसंघर्षाला सुरूवात होताना दिसते.

आवली माहेरी लाडात, सुखात वाढली असली तरी परिस्थितीपुढे नमते घेणे हा तिचा स्वभाव नाही. तिचा प्रयत्नावर विश्वास आहे. त्यामुळे ती तुकारामांच्या नाकर्तेपणावर राग काढताना दिसते. ती प्रत्येकवेळी त्यांना सांभाळण्याचा, सावरण्याचा प्रयत्न करते. तिचा प्रयत्न जितका जास्त तेवढ्याच प्रयत्नात ते संसारापासून अलिप्त राहून विठ्ठलाकडे अधिकच ओढले जातात.

जगण्याच्या प्राथमिक गरजा म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा या गरजेसाठी आवलीचे जीवन ग्रासले आहे. पण स्वाभीमानी, जिद्दी, आवली कधी माहेरी जाताना दिसत नाही.

तुकाराम आपल्या कुटुंबाच्या पोटापाण्यासाठी लालजी सावकाराकडून दररोज धान्य आणतात. मात्र ते कर्ज वाड्याच्या बदल्यात असल्याने रक्कम पूर्ण झाल्यावर लालजी सावकार वाड्यावर जप्ती आणतो. आवली या जप्तीला विरोध करते. वाडा न देण्याचा खूप प्रयत्न करते. पण ते प्रयत्न निष्फळ ठरतात. तुकारामच तिची समजूत काढताना दिसतात. वाडा


16598

सोडताना तिला खूप दु:ख होते व संताप अनावर होतो. ती अशाही परिस्थितीत माणकूच्या घरी जोमाने संसार करताना दिसते.

दरम्यानच्या काळात आप्पाजी एके दिवशी आवलीला भेटायला येतात. पण तिच्या संसाराची झालेली वाताहत तुकारामांच्या कुटुंबावरील संकटे याची जाणीव नसल्याने या संकटात आवलीला भोगाव्या लागणाऱ्या यातना त्यामुळे ते खूप दु:खी होतात. तुकारामांना असलेले भक्तीचे वेड जाणून घेतात. मात्र संसार करून परमार्थ करण्याचा सल्ला ते तुकारामांना देतात.

विठ्ठलाच्या नामस्मरणात, भक्तीत गुंतलेले तुकाराम आपल्या कुटुंबासाठी काही काम करण्याचे ठरवितात. त्यासाठी ते गावातील बाळाजी सावकराकडे जातात. बाळाजी सावकर त्यांना शेत राखणीचे काम देतात. पण शेत राखतानाच विठ्ठलाच्या नामस्मरणात मन तल्लीन झाल्याने गुरे उभ्या पिकाची नासधूस करतात. यामध्ये बाळाजी सावकाराच्या पिकाचे नुकसान तुकारामांनी भरून द्यावे असे गावकरी व पंचठरवितात. या घटनाप्रसंगात आवली तुकारामांना खूप बोलते. हे नुकसान कशाने भरून द्यायचे याची चिंता तिला लागते पण हे रागाचे बोलणे केवळ मुले, संसार यासाठीच असते.

कादंबरीत लेखिकेने प्रत्येकवेळी आवली- तुकारामांच्या संकटाच्या वेळी विठ्ठलाला मानवी रूपात प्रकट करून अदृष्यरित्या योगायोग इत्यादी सारख्या घटकांचा उपयोग केला आहे. कारण बाळाजीला नेहमीपेक्षा जादा धान्य होते आणि बाळाजी जे धान्य जादा झाले आहे ते तुकारामांच्या कुटुंबाला देतात या घटनेतून विठ्ठल आपल्या संकटाला धावून आला आहे याची खात्री तुकारामांना आहे. त्यांचा विठ्ठलावरचा विश्वास अधिक दृढ होतो ते विठ्ठल भक्तीत अधिकच ओढले जातात. ते त्याच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करतात. आवलीची मात्र प्रत्येक प्रसंगात मनाची घुसमट होताना दिसते.

तुकारामांच्या कुटुंबाला शिवाजी महाराज यांनी दिलेल्या भेटवस्तूचा नजराणा तुकाराम मोठ्या मनाने परत करतात तर आपल्या मुलांचे संसाराचे अठराविश्व दारिद्र्य संपले अशी आशा बाळगणारी आवली करवादते. असे परस्पर विरोधी चित्रण घडून येते.तुकारामांची पराकोटीची विठ्ठल भक्ती आणि त्यामुळे संसारातील दुर्लक्ष यामुळे पिचलेली, अपयशी आवली घायाळ होताना दिसते. ती प्रसंगी आत्महत्या करण्यास जाते पण आत्महत्या करणे

तिला भेकडपणा वाटतो. ती केवळ तुकाराम, मुले, संसार यासाठीच परत येते. घरासाठी कंबर कसते.

आवली जितकी संसाराकडे ओढली जाते. तितक्याच प्रमाणात तुकाराम संसारातून अलिप्त होताना दिसतात. आपले आता संसारातील काम संपल्याचे आवलीला पून्हा-पून्हा सांगातात. ते एकांतात विठ्ठलाशी संवाद साधताना पाहून तुकाराम वेडे होतात की काय अशी ही तिला भीती आहे. त्यासाठी ती भिकं भटाकडून म्हाद्याला औषध आणण्यास सांगते. यावरून आवलीची पतीनिष्ठा दिसून येते. आपली जाण्याची वेळ झाली आहे.आपले इथले काम संपले आहे.असे निर्वाणीचे सांगणारे बुवा होळीच्या सणादिवशी आपण जात असल्याचे आवलीला सांगतात. आज आपण कायमचे जात आहोत असे ते सांगून भजनाला जातात. त्यांचे हे नेहमीचेच म्हणून ती त्याकडे दुर्लक्ष करते. सकाळपासून काम करून दमलेली आवली दुपारी थोडी झोपी जाते.तिला एक स्वप्न पडते. स्वप्नात तुकाराम महाराज गरूडाच्या पाठीवरील कमानीत बसून वर आकाशात गेले कधीही परत न येण्यासाठी. तुकारामांचे बोलणे. स्वप्न याचा अर्थ तिला कळतो. ती चरकते. टाहो फोडते तिचा आकांत चराचराला भेदून जातो. तुकारामांच्या जाण्यानं त्याची विठ्ठलभक्ती सार्थ झाली ते त्याच दिवशी एक महान संत बनले ते आकाशाएवढे झाले पण आवलीच्या जगण्याच, जीवनाच निधान हरपते. ती एकाकी होऊन भ्रमिष्ठ होते.

काही दिवसांनी ती शुद्धीवर येते. आपल्या या अवस्थेत आपल्या मुलांचे काय झाले असेल याचा विचार करताना दिसते. आपला दिनक्रम बदलते. काम आटोपून कधीही देवळात न जाणारी आवली कधीतरी तुकाराम विठ्ठलाला भेटायला निश्चित येतील आणि आपल्याला दिसतील या वेड्या आशेने ती विठ्ठलाच्या मंदिरात जात असते.

एके दिवशी विठ्ठलाच्या मूर्तीत तिला तुकाराम महाराज दिसतात. ती धावतच तुकारामांना भेटते. त्यांच्यापश्चातील आपली जीवनकहाणी व्यतीत करते ज्या टाळ-चिपळ्यांचा आपणास राग होता त्या आपण जिवापाड जपून ठेवल्याचे सांगते. त्या चिपळ्या त्यांच्याकडे देते. तुकारामही आपण तुलाच न्यायला आल्याचे सांगतात तिला खूप आनंद होतो आणि ती त्यांच्या हातात हात घालून बरोबर जाते. तिला त्यावेळी सप्तपदी चालत असल्याचा भास होतो.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## समारोप

प्रस्तुत कादंबरीतून आवलीचा संसारात जीवनासाठी करावा लागलेला संघर्ष तर तुकारामांचा विठ्ठलभक्तीसाठी करावा लागणारा संघर्ष हा परस्परविरोधी आहे. हाच कथानकाचा महत्त्वाचा भाग आहे. या संघर्षात तुकाराम विजयी होऊन संतपदाला पोहचून महान विभुती बनण्याचा मान मिळवतात.तर आवली अपयशी होऊन भेगाळताना दिसते. तुकाराम प्रकाशमान दिव्यासारखे आहेत तर आवली दिव्याची वात आहे. कादंबरीतून आवलीचे खरेखुरे दर्शन घडविले आहे.

## व्यक्तिरेखा :

व्यक्तिरेखा यालाच पात्र असे म्हटले जाते. पात्र म्हणजे कथात्मक साहित्यात एखाद्या व्यक्तीची साकारलेली शब्दरूप प्रतिमा होय.व्यक्तिचित्रणातून व्यक्तीचे विचार, स्वभाव, वागणे-बोलणे, वृत्ती-प्रवृत्ती या सर्व घटनामधून व्यक्तिरेखेची प्रतिमा साकार होते.

व्यक्तिरेखा हा कादंबरीचा केंद्रबिंदू असल्याने व्यक्ती कुटुंब, समाज, निसर्ग यांच्यातील परस्परासंबंधाचा वेध कादंबरीत येत असतो. व्यक्ती ज्या समाजात वावरते त्या समाजाची वैशिष्ट्ये, परिमाणे त्या व्यक्तीमध्ये अंतर्भूत असतात. मग ते परिमाण व्यक्तीच्या मनाचे असते अथवा वृद्धी,आयुष्य, प्रदेश निसर्ग, काळ, समाज, संस्कृती इतिहास वा अन्य कोणत्याही अंगाचे असो. म्हणून उषा हस्तक लिहितात की, 'व्यक्तीला असणाऱ्या अशा अनेकविध परिमाणांचा उपयोग करण्याची क्षमता केवळ कादंबरीत असल्यामुळे मानवी जीवनव्यवहारांचे कोणतेही रूप ती मूर्त करू शकते' ४

निवेदक व संवाद यांच्या माध्यमातून कादंबरीत व्यक्तिदर्शन घडत असते. घटना प्रसंगात गुंतलेली व्यक्तिचित्र कादंबरीचा प्रमुख घटक असतो. कादंबरीत मुख्य व्यक्तिरेखा व गौण व्यक्तिरेखा अशा दोन प्रकारच्या व्यक्तिरेखा असतात.

प्रस्तुत कादंबरीतील व्यक्तिरेखा खालीलप्रमाणे आहेत.

१) प्रमुख व्यक्तिरेखा

अ) आवली

ब) तुकाराम

२) गौण व्यक्तिरेखा

अ) पुरुष व्यक्तिरेखा

ब) स्त्री व्यक्तिरेखा

क) इतर व्यक्तिरेखा

## 'आवली'

आवली ही 'तुकयाची आवली' कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा असून तिच्या व्यक्तिचित्रणातून आयुष्याची संघर्ष कहाणी चित्रित होते. आवलीचे बालपण सुखाचे आहे ती तेज बुद्धिची आहे. चौकश हुशार आहे. कादंबरीच्या प्रत्येक भागामध्ये ती सातत्याने आपल्या समोर स्पष्ट होते. केवळ आठ वर्षांपासूनची आवली आपल्या जीवन अंतापर्यंत संसार, मुले, पती यांच्यासाठीच जीवनातील तळमळीचे क्षण वाचकापुढे ठेवते. तुकाराम संत पदाला पोहचून आभाळाएवढे होण्यात मोलाची साथ देणारी आवली त्या विशाल वृक्षाची मुळी बनून राहिली आहे.

आवली वयाने लहान असली तरी विवाहानंतर विचाराने आणि जबाबदारीने प्रौढ झाल्याची जाणवते. लग्नानंतर तिच्या जीवनात अनेक संकटाची मालिका सुरू आहे. आई-वडिलांप्रमाणे भेटलेले प्रेमळ असे सासू-सासरे म्हणजे बोल्होबा व कनकाई यांचा एका पाठोपाठ वृद्धत्वाने मृत्यू दिराचे परांगदा होणे, त्यांची बायकोही मरण पावते, तुकारामांची पहिली पत्नी रूक्मिणी व तिचा मुलगा संताजी यांचा मृत्यू या सर्व दु:खद घटना अतिशय कठीण अवस्थेत पचवताना दिसते. तर उपरोक्त घटनांनी निराश, हतबल, ढासळलेल्या तुकारामांना सावरण्याची व सांभाळण्याची वेळ आवलीवर येते. तुकारामांच्या प्रत्येक संकटात आवली धैर्याने सामोरी जाताना लेखिकेने प्रकट केली आहे.

आवलीला लहानपणापासून विठ्ठल या दैवताबद्दल मनापासून राग आहे. कारण तिच्या मते विठ्ठलाने आजपर्यंत भक्तीचे भले केले नाही. याचे पुरावे तिने लहानपणी कथेतून ऐकले होते.त्याााठी ती ज्ञानोबा, चोखामेळा, गोराकुंभार यांची उदाहरणे देताना दिसते. अशा विठ्ठलाची भक्ती तुकारामानीही करू नये, असे तिला वाटते. संकटाने खचून जाणे, निराश, हतबल होणे, देवावर हवाला ठेवणे या गोष्टी तिला पटत नाहीत. तिचा प्रयत्नावर फार मोठा विश्वास आहे.

आवली संसारी स्त्री आहे. तुकारामांनीही आपल्या साथीने संसार करावा, अशी तिची माफक इच्छा आहे. ज्याच्या वेडाने आपला नवरा वेडा झाला आहे. आपला संसार मोडला आहे. त्या विठ्ठलाला मानवी रूपात व्यक्त करून शिव्या देताना दिसते. संसार, मुले, नवरा सांभाळताना तिची घुसमट होते. दुष्काळात हवालदिल झालेली आवली स्वाभिमानी वृत्तीची दिसून येते. ती मदतीसाठी माहेरी जातानाा दिसत नाही. पण जीवनसंघर्षात मात्र नेहमीच पराभूत झाली आहे. मात्र वाईट परिस्थितीशी ती झगडा सोडताना दिसत नाही. काटकसरी वृत्तीची आवली कोंड्याचा मांडा करून संसार करताना दिसते. प्रसंगी ती कठोर बोलून तुकारामांना कर्तव्याची जाणीव करून देते.

एकेकाळी सधन असणाऱ्या तुकारामांच्या कुटुंबाने इतरांना सुपाने धान्य दिले होते.मात्र आता त्यांच्याकडून पसाभर मागून आण्याची वेळ येते. हे पाहून तिचे मन दु:खी, व्याकूळ होते. वाड्यावरील जप्तीच्यावेळी ती लालजी सावकाराला विनवणी करून वाडा वाचविण्याचा प्रयत्न करते. पण खुद्द तुकारामच तिची समजूत काढताना हे पाहून निमूटपणे मुलांसह बाहेर पडते व माणकूच्या घरी संसार मांडते. आवलीच्या जीवनात सोसण्या व्यतिरिक्त कोणत्याच गोष्टी येत नाहीत. तरीही ती तुकारामांबरोबर आशादायी जीवन जगते. ती तुकारामांचा संसार सांभाळणारी आहे. विठ्ठलाच्या नामस्मरणात गुंग झालेल्या तुकारामांना शोधून ती भाकरी घेऊन जाते. यातून तिच्यातील प्रेमळ, मायाळू कर्तव्यदक्ष पत्नी दिसून येते.

तुकारामांच्या संसारात आपण कोण आहोत आपले कर्तव्य काय आहे. याची तिला जाणीव आहे. म्हणूनच ती भामनाथाच्या डोंगरातही काट्याकुट्यातून वाट काढून भाकरी घेऊन जाते व त्यांना घरी आणते. आप्पाजी भेटायला आल्यावर ती तुकारामांच्या दोषांवर पांघरून घालताना दिसते. इतका त्रास सोसूनही ती विसाव्यासाठी माहेरी जात नाही. कारण आपल्या जाण्याच्या काळात तुकाराम पूर्ण गोसावीच होतील, अशी शंका येते व माहेरचा मोह टाळते. यातून तिची गृहदक्षता दिसून येते.संसाराची ओढ, तुकारामांवरील अतूट माया दिसून येते.

एका हाती संसार सांभाळणारी आवली प्रसंगानुरूप त्रागा करीत असली तरी जेव्हा तुकारामांच्या पोथ्या पाण्यात टाकण्यासाठी रामेश्वरभट गुरवाकडून पोथ्या आणावयास लावतो तेव्हा आवली म्हणते, 'आग लागो त्या रामेश्वर भटाला पाटीभर शेण दे जा त्याला. पोथ्या मागतोय मेला, त्या लिहिताना माझ्या नवऱ्यानं ना माझी काळजी केली, ना पोराबाळांची. रगत


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आठवलंय त्यांनी या पोथ्या लिहिण्यासाठी उपाशी–तापाशी राहून लिहिल्यात त्या आणि म्हण पाण्यात टाकायच्यात. चल आधी चालता हो इथून जातोस का आता ओतू शेणाची पाटी डोक्यावर?'[५]

यावरून आवली तुकारामांच्या जीवनातील प्रत्येक चांगल्या–वाईट क्षणाची भागीदार आहे हे दिसून येते.

इंद्रायणीमध्ये जेव्हा पोथ्या बुडविल्या तेव्हा तुकारामांना खूप दुःख झाले होते, हे पाहून आवलीला अश्रु अनावर होताना दिसतात. या प्रसंगात ती आपल्या घायाळ नवऱ्याला सांभाळताना दिसते. ती एक पत्नी होतीच पण माता होऊन तुकारामांना आधार देताना दिसते. त्यांच्या दुःखात सहभागी होते. सोडलेल्या पोथ्या वीस दिवसांनी परत मिळाल्या त्याही न भिजता हे पाहून तिला खूप आनंद होतो. ती संसारातील यातना विसरते हे पाहून तिच्या भाबडेपणाचा प्रत्यय येतो. तिला तुकारामांच्या कष्टाची, पुण्याईची जाणीव होताना दिसते.

शिवाजी महाराज व तुकाराम यांच्या भेटीच्या प्रसंगात शिवाजी महाराज तुकारामांना प्रेमाची भेट म्हणून नजराणा देतात. त्यातील भेटवसतू पाहून आवलीला आपले दारिद्र्य संपले अशी अशा वाटते पण तुकाराम जेव्हा त्या नजराण्याचा स्वीकार करण्यास नकार देतात व त्याचाउपयोग लोककल्याणासाठी करा, असे सांगतात मनात सुखाचे मांडे खाणारी आवली तुकारामांच्या इच्छेला दुजोरा देताना दिसते ती म्हणते, 'राजे, पतीची इच्छा हेच पत्नीचे दागिने, पतीचं आज्ञा–पालन हेच शालू–शेले, आणि पतीची इच्छापूर्ती आणि सेवा हेच तिचं धन आम्हाला त्याचं मोल जास्त आहे. तुम्हीच आम्हाला माफ करा. तुम्ही दिलेला नजराणा आम्हो स्वीकारू शकत नाही!'[६]

यावरून आवलीची हिंदू स्त्रीला साजेशी पतीनिष्ठा दिसून येते. ती पतीचा स्वाभिमान सांभाळताना दिसते.

प्रस्तुत कादंबरीत आवलीचे चित्रण वेगवेगळ्या घटना प्रसंगातून अभिव्यक्त होताना दिसते. अनेक निवेदनातून तिच्या विषयीचे विवेचन कादंबरीत येत रहाते. तिच्या व्यक्तिरेखेला तिच्या संपूर्ण जीवन संघर्षासह मंजुश्री गोखले यांनी चित्रित केले आहे.

तिचा त्रागा जरूर आहे. पण केवळ संसार, मुले यांच्यासाठीचा आहे. तिला तुकारामांना दुखवायचे नाही. तर जिद्दीनं संसार करावयाचा आहे. तिचा स्वाभिमान फुंकरीत

फुलविलेल्या विस्तवासारखा आहे. ती संसाराशी एकाकी झगडताना दिसते. तुकाराम जेव्हा वैकुंठाला जातात तेव्हा आवलीलाही येण्याचा आग्रह करतात पण केवळ पोटातील गर्भाखातर ती तुकारामांना नम्रपणे नकार देताना दिसते. तिला मुले व संसार यांच्या जबाबदारीची जाणीव आहे. पती वैकुंठाला गेल्यानंतर वैध्यव्यातही मुलांना नीट सांभाळते. आपले पती ज्या टाळ-चिपळ्यांच्या संगतीत जगले त्या टाळचिपळ्यांविषयी राग असूनही ती तुकारामांच्या पश्चात जिवापाड सांभाळते. शेवटी आपले पती ज्या वाटेने गेले त्याच वाटेने जाण्याचा निर्णय घेते. हा तिचा निर्णय तुकारामांवरील प्रेम व पतीनिष्ठा अधोरेखित करतो.

अशी ही आवली तुकारामांच्या जीवनात त्यांच्या पराकोटीच्या भक्तीने संतपदाला पोहचण्यासाठी मोलाचा वाटा उचलणारी, तुकारामाची सहचारीणी 'तुका आकाशा एवढा' होण्यात स्वयसिद्धा ठरलेल्या आवलीचे चित्रण बारीक-सारीक तपशिलासह वाचकांच्या मनात तुकारामांच्या सारखोच दीर्घकाळ रेंगाळताना दिसते.

## तुकाराम

'तुकयाची आवली' कादंबरीत ज्या व्यक्तिरेखा आलेल्या आहेत त्यात महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा म्हणजे 'संत तुकाराम' ही होय. संत तुकारामांच्या साधुत्त्वाची लक्षणे त्यांच्या जीवन कार्यात ठायीठायी प्रत्ययाला येतात. एखादी व्यक्ती तिच्या कोणत्या तरी एखाद्या गुणामुळे वैशिष्ट्येपूर्ण ठरत असते. परंतु गुणांमुळे कर्तृत्वामुळे असामान्य ठरत असते. आपल्या भक्तीने संत पदाला पोहचलेल्या महान विभूतीचे व्यक्तिचित्रण प्रस्तुत कादंबरीतून प्रभावीरित्या मांडले आहे.

संत तुकाराम हे देहू गावातील एका सत्व संपन्न घराण्यातील शुद्ध वातावरणात वाढलेले आहेत. त्यांच्या आईचे नाव कनकाई व वडिलांचे बोल्होबा आंबिले- मोरे असे आहे. ते बोल्होबांचे तृतीय पुत्र आहेत. तुकारामांचा विवाह तत्कालिन पद्धतीनुसार बाल वयात रखुमाबाई हिच्याशी होतो. ती दम्याच्या विकाराने आजारी असल्याने त्यांचा दुसरा विवाह पुण्याचे सधन व्यापारी आप्पाजी गुळवे यांची मुलगी आवली हिच्याशी होतो.

बोल्होबाचे वय झाले असल्याने संसाराची सर्व सूत्रे ते तुकारामांकडे सोपवतात आवली सारखी समर्थ व गुणसंपन्न मुलगी तुकारामांना पत्नी म्हणून लाभली याचा आनंद बोल्होबा व कनकाईला होतो. पण तुकारामांच्या लग्नानंतर फारच थोड्या दिवसात बोल्होबा व कनकाई

यांचा पोठोपाठ मृत्यू होतो, थोरला भाऊ परागंदा होतो. त्याची पत्नी मरण पावते. या क्रमाने पाठोपाठ घडणाऱ्या घटनांनी तुकारामांच्या संवेदनशील हळव्या मनाला उध्वस्त करून जातात. हे घाव सोसत तुकाराम आपली पत्नी आवली हिच्या साथीने पुन्हा उभे राहतात. परंतु अकल्पित असे अनेक बरेवाईट प्रसंग तुकारामांच्या जीवनात घडून येतात. त्यावेळी महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडल्याने अनेक माणसे अन्नधान्यावाचून मरताना तुकारामांनी पाहिली, गुरे-ढोरे तडफडताना पाहिली. ते खूप दु:खी व निराश झाले. दुष्काळामुळे त्यांची सावकारकी बसली त्यांचा लाडका मुलगा संताजी ही या दुष्काळाचा बळी ठरला. दरम्यान पत्नीकडे दुर्लक्ष झाल्याने तिचा दम्याचा विकार बळावला व तीही मरण पावली. अशा घटनांनी तुकाराम उन्मळून पडतात. त्यांचे जीवन संघर्षमय बनते. वारंवार होणाऱ्या आघाताने भूईसपाट होतात. त्यांना दु:ख हे दु:ख वाटत नाही संसार असार वाटू लागतो.

उपरोक्त सर्व घटनांनी खचलेले हतबल झालेले तुकाराम आपल्या आयुष्याचा अन्वयार्थ शोधताना दिसतात. परिणामी ते विठ्ठल भक्तीकडे ओढले जातात. त्यांना विठ्ठलाच्या नामस्मरणाची ओढ लागते. ते भजन कीर्तनात ध्यान मग्न होतात. याचवेळी ते 'बुवा' या उपाधीने गणले जातात.

तुकारामांचे संसारापासून लांब जाणे आणि त्यांच्या पत्नीने त्यांना तितक्याच ताकदीने संसारात खेचून आणणे यामध्ये त्यांची घालमेल होताना दिसते. पण या चढाओढीत तुकाराम विजयी झाल्याचे दिसून येतात. तर आवली पराभूत होताना दिसते. तुकाराम देवभोळे पापभीरू आहेत. मात्र ते लोभी नाहीत. वाड्याच्या जप्तीच्यावेळी लालजी सावकाराशी विनंतीची तडजोड करताना दिसत नाहीत. दुष्काळात लालजी सावकाराकडून घेतलेल्या कर्जाच्या बदल्यात ते त्यांना वाडा गहाण देतात. आवली त्यांना विरोध करण्यास सांगते. पण तुकाराम कृतघ्न होताना दिसत नाहीत. यातून त्यांची कृतज्ञवृत्ती दिसून येते. त्यांचा विठ्ठलावर खूप मोठा विश्वास आहे. आपला संसार सांभाळायला आपला विठ्ठल समर्थ आहे असे ते आवलीला वेळोवेळी ग्वाही देताना दिसतात. यातून ते स्थितप्रज्ञ, शांत, संयमी दिसून येतात.

भजन कीर्तनात दंग असल्यामुळे तुकारामांना घरी जाण्याचे विस्मरण होते. अशावेळी आवली त्यांना भाकरी घेऊन शोधत येते तेव्हा त्यांना भाबड्या आवलीला पाहून भडभडून येते. यातून त्यांची भावुकता दिसून येते. त्यांचा प्रेमळपणा दिसून येतो.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आप्पाजींना जेव्हा आवली - तुकारामांच्या संसाराची वाताहत दिसून येते तेव्हा ते तुकारामांना संसार करून परमार्थ करण्याचा सल्ला देतात. तेव्हा तुकाराम आप्पाजींना म्हणतात, 'आप्पाजी, खरं आहे तुमच! मला ही जबाबदारी टाळून चालणार नाही.ते माझं कर्तव्यच आहे. ते मला झेललच पाहिजे आप्पाजी, मी तुम्हाला शब्द देतो की, माझ्या परीन मी प्रपंच नीटनेटका करायचा जास्तीत जास्त प्रयत्न करीन फक्त मला काही वेळ द्या. या पोरांच्या मीठ भाकरीसाठी तरी मी कुठतरी काम करीन. आप्पाजी मला कळत नाही. सांगणार, मार्ग दाखविणारं कुणी वडिलधार मार्ग दाखविणारं कुणी माणूस उरलं नाही, मी भरकटलो होतो पण मी स्वत:ला सुधारेन त्यासाठी नक्की प्रयत्न करेन'[७]

यावरून ते कष्टाळू व्यासंगी वृत्तीचे दिसून येतात. तुकारामांची विठ्ठलावर उदंड श्रद्धा आहे. त्या श्रद्धेपोटीच त्यांच्या भजन कीर्तनात गुंग होताना दिसतात. काम मागावयास गेलेल्या तुकारामांना बाळाजी सावकार उसाची मोळी देतात पण घरात उपाशी लेकरे असतान ते वाटेत भेटलेल्या मुलांना उसाची मोळी वाटून येतात. ते परोपकारी व भूतदयावादी वृत्तीचे आहेत हे दिसून येते.

पोथ्या पाण्यात बुडविणाऱ्या रामेश्वर भटाच्या अंगाचा जेव्हा दाह होतो. तेव्हा ते त्याला माफ करून अंगाला ओली माती लावून त्याचा दाह कमी करतात. यातून त्यांच्या क्षमाशील वृत्तीचा प्रत्यय येतो.

विठ्ठलाच्या भक्तीने पराकोटीला पोहचलेल्या तुकारामांना खुद्द शिवाजी महाराज भेटावयास येतात ते तुकारामांना भेट म्हणून मौल्यवान नजराणा देतात. तो नजराणा ते लोकल्याणासाठी स्वाभीमानाने परत करतात. यातून त्यांची लोकल्याणकारी, समाजाभिमुख वृत्ती दिसून येते.

आपल्या घराण्याची पूर्वापार चालत आलेली वारी करण्यासाठी ते पंढरपूरला जातात पण मूर्तीत प्राण नव्हता, ती केवळ दगडी मूर्ती पाहून सैरभैर होताना दिसतात. त्यांचा विठ्ठलावर विश्वास व श्रद्धा आहे.

प्रस्तुत कादंबरीत तुकारामांचे संघर्षमय जीवन अनेक घटनाप्रसंगानी उन्मळूनपडलेले प्रत्ययास येते त्यामुळे त्यांची अशी व्यक्तीरेखा आपल्या समोर येते.

आपलं विठ्ठलाकडे झुकण आणि आवलीचा संसारातील संघर्ष हे समजून ही तुकाराम संसाराकडे वळताना दिसत नाहीत ते संसारात वळले असते तर त्यांच्या हातून होणारे लोकोत्तर कार्य घडले नसते. हे त्यांच्या विठ्ठल भक्तीतून दिसून येते. आपण विठ्ठल भक्तीत दंग होऊन आवली, मुले, संसार याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले असल्याचे व आवलीवर फार मोठा अन्याय केल्याचे कबुली देताना दिसतात. आपण आकाशाएवढा होण्यात आवलीला धरणीची उपमा देताना दिसून येतात.

उपरोक्त विवेचनावरून असे म्हणता येईल की, तुकारामांच्या विठ्ठलभक्तीला एखादीच घटना कारणीभूत नसून अनेक घटना-प्रसंगामुळे तुकारामांच्या मनावर प्रचंड मानसिक ताण येतो. अनपेक्षित मनाविरूद्ध घडणाऱ्या घटना तुकारामांना सहन होत नाहीत परिणामी ते संसारापासून दूर जातात. याचे चित्रण लेखिकेने सूक्ष्मपणे केले आहे.

कादंबरीत आवलीच्या जीवनसंघर्षाला अधिक गोचर करण्यासाठी तुकारामांची महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा निर्माण केली आहे.

**२) गौण व्यक्तिरेखा**

**पुरुष व्यक्तिरेखा**

## आप्पाजी

आप्पाजी हे आवलीचे वडील आहेत. ते पुण्यातील सधन व्यापारी असून ते तेथे आप्पाजी शेट या नावाने ओळखले जातात. गावात त्यांना मान, पान, आदर, प्रतिष्ठा आहे. गावाला त्यांची आदरयुक्त भीती आहे. आवलीवर त्यांचे खूप प्रेम आहे. ते व्यापारासाठी जेथे-जेथे जातात त्या ठिकाणची खेळणी ते आवलीसाठी आणत. गावातील मंदिर बांधणे संदर्भातील सर्व सूत्रे आपल्या हाती घेतात या नियोजनात भेटलेले त्यांचे स्नेही देहूतील बोल्होबा आंबिले-मोरे यांचा तृतीय मुलगा तुकाराम यांच्याशी आवलीचा विवाह करून देतात.

आप्पाजी गावातील लोकांच्या अडचणी समस्या जाणून घेऊन त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे आहेत. संसाराला कंटाळलेला राऊ पंढरीला विठ्ठलभक्ती करण्यासाठी गेल्यानंतर सारजाक्का आपले गाऱ्हाण आप्पाजीकडे मांडते. तेव्हा ते धनाजीकडून निरोप पाठवून राऊला परत पुण्यास जाणून त्याची समजूत काढतात. ते संपाताने चिडले म्हणजे हात

मागे बांधून येरझाऱ्या घालतात. मात्र लगेच भानावर येऊन समजुतीच्या सूरात प्रेमाने बोलतात. राऊच्या बायकोचे व मुलांचे जगणे राऊवर कसं अवलंबून आहे. याची समजूत घालतात. संसार हे आपलं कर्म आहे. संसार उघड्यावर टाकून भक्ती करा, असे विठ्ठल सांगत नाही. तसे असते तर त्या विठ्ठलाने रूक्मिणीशी लग्न केलं नसतं अशा प्रकारे ते समजूत काढताना दिसतात आणि राऊने संसार करावा, म्हणून ते गावातील देवळात भक्त म्हणून ठेवतात. गावातील प्रत्येक लोकांचे प्रश्न ते विचारपूर्वक सोडवताना दिसतात. ते दिलदार वृत्तीचे आहेत.

आवलीचा विवाह ते तुकारामांशी विचारपूर्वक करताना दिसतात. तुकाराम विवाहित असून एका मुलाचे बाप आहेत हे माहित असूनही आपली लाडकी मुलगी आवली तिथे सुखात, कौतुकात राहिल असा त्यांना विश्वास आहे. म्हणून ते या लग्नाला होकार देताना दिसतात.

आवलीचे लग्न तुकारामांशी करून समाधानी होणारे आप्पाजी आवलीच्या पाठवणीने दु:खी होतात ते कधीतरी देहूला आवलीला भेटावयास जातात. पण दरम्यानच्या काळात आप्पाजीही आवलीकडे जाताना दिसत नाहीत. मात्र दुष्काळानंतर ते जेव्हा तिच्याकडे जातात तेव्हा तिची भयानक परिस्थिती पाहून त्यांच्या काळजाच्या चिंधड्या होतात. कारण आवलीच्या घरातील दु:खपूर्ण घटना, दुष्काळ, तुकारामांच्या विठ्ठलभक्तीमुळे संसारातील दुर्लक्ष यामुळे आवलीच्या संसाराची वाताहत झालेली पाहून त्यांच्या अश्रुंचा बांध फुटतो. ते गहिवरताना दिसतात. ते तुकारामांना अनुभवाने व वयाच्या आधारे संसार करून परमार्थ करण्याचा सल्ला देताना दिसतात. त्यासाठी ते त्यांना बोल्होबांच्या भक्तीचे उदाहरण देतात. त्यानीही भक्ती केली पण प्रपंचही चांगला केला. आपली आवलीही कोंड्याचा मांडा करेल पण ससार करील तुम्ही तिला साथ द्या, असे कळकळीने सांगणारे आप्पाजी कादंबरीत चित्रित झाले आहेत.

## बोल्होबा

बोल्होबा हे संत तुकारामाचे वडील आहेत. ते देहू गावचे सधन, प्रतिष्ठित, घरी महाजनकी असलेले व्यापारी आहेत. पंचक्रोशीत एक सज्जन गृहस्थ असं त्यांच नाव आहे. ते विठ्ठलाचे पाईक असून धार्मिक वृत्तीचे आहेत. त्यांच्या घरी दररोज कुणी ना कुणी वारकरी कीर्तनकार किंवा साधू-संन्याशी पंगतीला असे.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विठ्ठल मंदिराच्या जिर्णोद्धाराच्यावेळी ते पुण्यात आप्पाजींच्या घरी स्नेहो म्हणून येतात. त्यावेळी आप्पाजींच्या मुलीला 'आवली'ला तुकारामांसाठी मागणी घालतात. कारण त्यांच्या दृष्टिने आवली तुकारामांचा संसार सांभाळायला समर्थ आहे. कारण तुकारामांची पहिली पत्नी आजारी आहे. त्यामुळे त्यांना आज ना उद्या एकटं पडावं लागणार आहे. तुकारामांचा मुलगा पोरका होणार याची जाणीव त्यांना आहे. त्यासाठी ते चिंताग्रस्त आहेत. पण आवलीसारखी गुणी मुलगी तुकारामांना पत्नी म्हणून मिळाली तेव्हा ते चिंतामुक्त होताना दिसतात. ते तिच्यावर पितृवत प्रेम करतात. आवलीवरील सुसंस्कार, तिचा कामसूपणा, चपळता, पाहून मोठ्या विश्वासाने संसाराची सारी सूत्रे आवलीच्या हाती देतात. कारण तिचा सक्षमपणा, सामर्थ्य हे गुण त्यांना दिसून येतात.

बोल्होबा परोपकारी वृत्तीचे आहेत. सईसारख्या निराधार, नवऱ्याने काळी म्हणून टाकलेल्या मुलीला आधार देऊन तिचा सांभाळ करताना दिसतात. तिला वडिलांची माया देतात.

असे हे संत परंपरेचा वारसा असणारे बोल्होबा आवली-तुकारामांवर संसाराचा भार मोठ्या विश्वासाने ठेऊन वार्धक्याने मृत्यू पावतात.

## राऊ

या कादंबरीत रेखाटले गेलेली आणखी एक व्यक्तिचित्र म्हणजे राऊ. हा संसाराला कंटाळलेला, विटलेला असा चित्रित केलेला आहे. त्यांच्या अंगी मोठ्या माणंसाबद्दल आदरयुक्त भीती आहे. त्याला विठ्ठल भक्तीचे वेड आहे. विठ्ठलाची भक्ती मनाप्रमाणे करता यावी यासाठी तो संसार सोडून पंढरपूरला जातो. पण आप्पाजी सारजाची अवस्था पाहून त्याला पंढरपूराहून निरोप पाठवून बोलावून घेतात. त्यावेळी आप्पाजीकडे पाहण्याचे धाडस त्याच्याने होत नाही. मात्र तो आपल्या मनातील भावना आप्पाजींना बोलून दाखवतो. आपण गुरव असूनही विठ्ठलाची भक्ती करता येत नाही. ही त्याची खंत आहे. मात्र आप्पाजींनी गावातील विठ्ठलाच्या मंदिरात विठ्ठलभक्ती करण्याची सूचना केल्यानंतर त्यांच्या आज्ञेचे पालन करताना दिसतो. यावरून तो नम्र व आज्ञाधारक असल्याचे दिसून येते.

## माणकू

देहू गावातील माणकू देवभोळा असून तो विठ्ठलभक्त आहे. तो तरुण वयातच विठ्ठलाची भजने तल्लीन होऊन गातो. तो बोल्होबाच्या घरी कामाला असणाऱ्या सईचा नवरा आहे. पण सई काळी आहे. म्हणून त्याने तिला सोडले आहे.
सईचा स्वीकार करण्याबद्दल आवली जेव्हा त्याची समजूत काढते तेव्हा तो तिला प्रत्युत्तर देताना दिसतो. मात्र सईचा काळा रंग आणि विठ्ठलाचा काळा रंग एक आहे. आणि काळा रंग माणकूला आवडत नाही. तेव्हा काळ्या विठ्ठलाची भक्ती करण्यास मंदिरात जाऊ नये.अशी मनाई केल्यावर त्याला आपल्या वागण्याचा पश्चाताप होताना दिसतो. तो आपली चूक आवली समोर नम्रपणे कबूल करतो व सईचा स्वीकार करतो.

तुकारामांच्या वाड्यावरील जप्तीच्या प्रसंगात तो आपले शेतातील घर उदारमनाने आवली-तुकारामांना देताना दिसतो. तो दयाळू वृत्तीचा दिसून येतो.

## लालाजी सावकार

लालजी सावकार हा नावाप्रमाणेच लालची सावकार आहे. नडलेल्या लोकांना वस्तूच्या मोबदल्यात कर्ज देणारा आहे. तुकारामांना तो वाड्याच्या बदल्यात कर्ज देतो व कर्जाची रक्कम पूर्ण झाल्यावर वाड्यावर आपली लोकं घेऊन वाड्यावर जप्तीसाठी येतो. वाडा जप्त न करण्याबद्दल आवली त्याची विनवणी करते. पण त्यच्या अन्यायी, निष्ठूर स्वभावावर कोणताच परिणाम होताना दिसत नाही. त्याला दयाभाव निर्माण होत नाही. तो आवली आपले सामान बाहेर काढण्यास सांगतो व वाड्याचा ताबा घेतो. त्यांच्या व्यक्तिचित्रणातून तात्कालीन सावकारी पाशाची प्रतिमा दिसून येते.

## बाळाजी

बाळाजी हा देहूतील एक सधन शेतकरी आहे. तो एक चांगला माणूस आहे. त्यांना तुकारामांचा प्रामाणिक स्वभाव माहित आहे. काम मागावयास गेलेल्या तुकारामांना आपले शेत राखणीचे काम देऊन त्यांना मदत करताना दिसतो. तुकारामांसारखा सज्जन, पापभीरू माणूस आपल्याला कामाला मिळाल्याने आपल्या पीकाला कोणत्याही धोका नाही. असा त्याचा विश्वास आहे. मात्र विठ्ठलाच्या नामस्मरणात गुंतल्याने तल्लीन झालेल्या तुकारामांचे दुर्लक्ष होते. तेव्हा काही जनावरे शेतात घूसून पीकाचे नुकसान करतात ही बातमी गावकऱ्यांना

व बाळाजीला समजल्यानंतर गावकरी,पंच तुकारामांनी पीकाची नुकसान भरपाई द्यावी, असा दंड करतात. पण पीक कापणीनंतर चमत्कार व्हावा असे घडते. बाळाजीलाच काय सर्वांना धान्य भरपूर होते. बाळाजी आपल्याला झालेले एक खंडी जादा धान्य तुकारामांनी आपल्याला लागेल असे न्यावे असे कबूल करतात.

यावरून बाळाजी परोपकारी वृत्तीचा व उदार मनाचा असल्याचे दिसून येतो.

## रामेश्वर भट

रामेश्वर भट हा काशीचा राहणारा आहे. तो ब्राम्हण असून धर्ममार्तंड आहे. तत्कालिन समाजात वेदातील ज्ञान सर्व सामान्य लोकांनी घ्यायचे नाही. असा कायदा होता तो कायदा तुकारामांनी मोडला होता. त्यांनी वेदातील ज्ञान सर्वसामान्य माणसांना आपल्या भजन - कीर्तनाच्या माध्यमातून दिले होते. त्याचा जाब विचारण्यासाठी तो मोठ्या दिमाखाने काशीला आला आहे. त्याचा स्वभाव तापट व निष्ठूर आहे. वेदांचं वाचन, अध्ययन, अध्यापन करण्याचा अधिकार फक्त ब्राह्मण समाजाला असताना, धर्मपीठाचा तसा कायदा असताना त्या कायदाचा भंग तुकारामांनी केला आहे. असा तो आरोप करताना दिसतो व तुकारामांना आरोप मान्य करण्यास भाग पाडतो. तो अन्यायी आहे. तो तुकारामांना शिक्षा म्हणून त्यांनी आतापर्यंत लिहिलेल्या पोथ्या नष्ट करण्याचा आदेश देतो. गुरवाकडून पोथ्या मागितल्यावर आवली पोथ्या देण्यास नकार देते त्यावेळी तो खुद्द तुकारामांनी पोथ्या आणाव्यात असे फर्मान सोडताना दिसतो. त्याला तुकारामांच्या मनाची जराही कणव येताना दिसत नाही.

रामेश्वरभटाच्या मनात तुकारामांच्या मोठेपणाचा द्वेष खदखदताना दिसतो. म्हणूनच त्यांच्या पोथ्या तो मोठ्या आनंदाने पाण्यात सोडून ब्राह्मणशाहीच्या विजयाचा आनंद साजरा करताना दिसतो.

निराश, एकाकी, दु:खी तुकारामांना पाहून त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे भरते येताना दिसते. त्यांचे काम झाले होते. त्यांचा पोथ्यांवर कोणताही अधिकार नव्हता मात्र चमत्कार व्हावा तशी घटना घडते. तुकारामांच्या पोथ्या एका गुरवाच्या मुलाला सापडतात. त्या तुकारामांना परत मिळतात. तेव्हा आवलीसह संपूर्ण गावाला आनंद होतो. गावकरी त्या पोथ्याची पालखीत घालून मिरवणूक काढतात. त्यावेळी रामेश्वरभटाच्या अंगाचा दाह सुरू

होतो तो बेचैन होतो. तेव्हा निष्ठूर रामेश्वरभटाची तुकारामांना दया येते. ते त्याच्या अंगाला इंद्रायणीतील गार माती लावतात व त्याचा दाह कमी करतात.

संकुचित वृत्तीच्या रामेश्वर भटाला सलणाऱ्या तुकारामांच्या मोठेपणाची जाणीव होते. त्यांची योग्यता कळते तो तुकारामांची माफी मागून नतमस्तक होताना दिसतो व पोथ्या असलेल्या पालखीला आपणहून खांदा देताना चित्रित झाला आहे.

**स्त्री व्यक्तिरेखा**

## आवलीची आई

'तुकयाची आवली' या कादंबरीत आवलीच्या आईचा उल्लेख 'आवलीची आई' असाच झाला आहे. ती एक संसारदक्ष स्त्री म्हणून रेखाटली आहे ती आवलीवर खूप प्रेम करते. तिच्यावर सुसंस्कार करते. लहान पणापासून मुलीच्या जातीला योग्य वळण असावे असे तिचे मत असल्याने ती आवलीच्या स्वभावाची काळजीने देखभाल करताना दिसते. केवळ आठ वर्षांच्या आवलीला ती उपवर झाली आहे. तिचे लग्न करायला हवे या चिंतेत ती आहे. तात्कालिन समाजाच्या विचारांचा पगडा तिच्यावर असल्याने स्वत:वर व आवलीवर काही बंधने घालताना दिसते. मुलीच्या जातीने जास्त बोलू नये, थोर काय सांगतील ते मान खाली घालून ऐकावं असे सुचविताना दिसते.

आवलीच्या आईची व्यक्तिरेखा पारंपारिक स्त्रिला साजेल अशी आहे. आपले पती आवलीचा विवाह बिजवर असणाऱ्या तुकारामांशी करतात. या विषयी तिच्या मनात सल आहे. बोचरी भावना आहे. पण ती आपल्या भावना पतीसमोर परखडपणे बोलताना दिसत नाही. उलट आपले पती करतात ते योग्यच आहे असे तिला वाटते.

आवलीची आई उदारवृत्तीची आहे. घरी आलेल्या व्यक्तिंना गुळपाणी देऊन आदरातिथ्य करताना दिसते. आप्पाजींच्या सूचना काटेकोरपणे पाळणारी ती गृहिणी आहे. निराधार गुणाबाईला आपल्या घरी आपुलकीने वागवते.

आवलीचे लग्न थाटामाटात पार पडावे कोणत्याही प्रकारची उणीव भासू नये यासाठी रात्रंदिवस कष्ट करते. आवलीचे लग्न होऊन सासरी जाताना तिला खूप दु:ख होते. तिच्या मातृभावना उफाळून आवलीची अनेक रूपे ती आठवताना दिसते.

## कनकाई

कनकाई ही तुकारामांची आई आहे. ती धार्मिक वृत्तीची आहे. आपला मुलगा तुकाराम यांच्या जीवनात पत्नीच्या आजारपणामुळे निर्माण झालेले वैराण वाळवंट याबद्दल चिंताग्रस्त आहे. पण बोल्होबानी केलेली आवलीची निवड व तिचे गुणवर्णन पाहून ती तुकारामाच्या लग्नाला संमती देते. तुकारामांचा मुलगा संताजीची हेळसांड होऊ नये, म्हणून काळजी घेते. दुसऱ्या विवाहाने आपल्या मुलाच्या जीवनात पुन्हा एकदा हिरवळ बहरेल म्हणून ती सुखावते.

कनकाई नेहमी स्वच्छतेचा आग्रह धरते. तिचा नीटनेटकेपणा हे तिच्या घराच्याठेवणीवरून दिसून येते. ती गृहदक्ष गृहिणी आहे. आवलीला सईची ओळख करून देताना ती तिला आपली मुलगी आहे असे मानते. यावरून तिची मायाळू व प्रेमळ वृत्ती दिसून येते. आवलीला ती प्रेमाने 'जिजा' या नावाने संबोधते. तिला आवलीबद्दल फार मोठा विश्वास आहे.

घराला घरपण देणारी प्रेमळ कनकाई बोल्होबाच्या मृत्युने भ्रमिष्ठ होऊन सैरभैर होते व संसाराची जबाबदारी आवलीवर सोपवून पतीच्या पाठोपाठ जगाचा निरोप घेते.

## रूक्मिणी

मंजुश्री गोखले यांनी चित्रित केलेली रूक्मिणी म्हणजे तुकारामांची पहिली पत्नी होय. ती दम्याच्या विकाराने आजारी आहे. ती खंगलेली हाडामांसाचा गोळा झालेली कृश अशी आहे. तुकारामांचे तिच्यावर खूप प्रेम आहे. तिच्या प्रेमाखातर तुकाराम दुसऱ्या लग्नाला नकार देतात. तेव्हा आपला आजार, भविष्य व तुकारामांचा अपूर्ण, अर्धवट संसार याचा पूर्ण विचार करून ती तुकारामांना दुसरे लग्न करण्याचा आग्रह करते. यावरून तिची समंजस व वैचारिक वृत्ती दिसून येते. ती तुकारामांच्या सानिध्यात फार थोडे दिवस राहिली आहे. आवली सारखी पत्नी तुकारामांचा संसार सांभाळण्यास समर्थ आहे हे पाहून आपला मुलगा संताजी याची जबाबदारी आवलीवर सोपवते.

रूक्मिणीचा मृत्यू या प्रसंगात तिचा शेवट हृदयस्पर्शी, संवेदनशील झाला आहे. या घटनेने वाचकांचे हृदय हेलावते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## गुणाबाई

गुणाबाई ही आप्पाजींच्या घरी कामाला आहे. पण केवळ आपण कामाला आहोत या भावनेने काम करताना कधीच दिसत नाही ती त्या कुटुंबाचा एक घटक मानून काम करताना दिसते. तिचे आवलीवर खूप प्रेम आहे. ती आवलीला लाडीकपणे जपताना दिसते. तिचे कोड-कौतुक, हट्ट पुरविते. दोघींच्या वयात खूप अंतर आहे. पण हे अंतर त्यांच्या मैत्रिच्या आड येत नाही. आवलीची वेणी घालणे, परकर नेसवणे, गजरा माळणे, गुळ-पोहे देणे, इत्यादी कामे ती आवलीच्या प्रेमाखातर करते. तिला विठ्ठलाचे अंभग म्हणायला आवडतात. ती नेहमी गुणगुणत असते. आवलीच्या विवाहाने ती एकाकी होते. आवलीची पाठराखीण म्हणून पाच दिवस रहाते.

गुणाबाई भावनाशील आहे. आप्पाजींच्या घरी रडत आलेल्या सारजाची ती स्त्रीसुलभ भावनेने चौकशी करते.

## सारजाक्का

सारजाक्का ही राऊची पत्नी आहे. आपला नवरा संसार सोडून पंढरपूरला गेला हे पाहून तिला दुःखाचे उमाळे येतात. ती आपले दुःख आप्पाजींना सांगते. आप्पाजी तिचा नवरा परत आणून आपण त्यास संसाराला लावू असे आश्वासन देतात. नवऱ्याच्या परागंदा होण्याने आपला संसार, मुले उघड्यावर पडतील अशी संशययुक्त तिला भीती आहे. यावरून सारजा एक कर्तव्यनिष्ठ, संसारदक्ष स्त्री असल्याचे दिसून येते.

## सई

सई ही बोल्होबांच्या घरी काम करणारी एक निराधार मुलगी आहे. कनकाईने तिला आपली मुलगी मानून आधार दिला आहे. तिचे लग्न झालेले आहे. पण ती केवळ काळी आहे म्हणून तिचा नवरा माणकूने तिला टाकले आहे. ती काळी असली तरी गुणाने चांगली आहे. कामसू व गरीब स्वभावाची आहे. आई, वडील, भाऊ साथीच्या रोगाला बळी पडल्याने निराधार सई बोल्होबांच्या घरी घरकामात मदत करून आपला उदरनिर्वाह चालवते. ती स्वावलंबी आहे.

सईच्या एकाकी जीवनात आवलीने केलेला प्रयोग म्हणजे माणकूला वेगळ्या पद्धतीने रंगाच्या बाबतीत विठ्ठलाच्या काळ्या रंगाचा संदर्भ देऊन त्याला मंदिरात जाण्यास मनाई

केल्याने देवभोळा माणकू सईचा स्वीकार करतो. त्यावेळी सईला आपला संसार पुन्हा मिळाला हे पाहून ती सद्‌गदीत होताना दिसते व आवलीचे मनोमन आभार मानून कनकाईच्या पाया पडते. यातून तिची प्रेमळवृत्ती, माया, जिव्हाळा, संसाराची ओढ नम्रता या गोष्टी दिसून येतात.

## काशीबाई

काशीबाई ही आवलीची शेजारीण आहे. ती नियमितपणे तुकारामांच्या भजन-कीर्तनाला जाते. तिला आवलीची संसारातील तळमळीची जाणीव आहे. ती आवलीला जवळून पहात असल्याने तिच्याबद्दल काशीबाईच्या मनात अनुकंपा आहे. आपणही एक स्त्री आहोत. या स्त्रीसुलभ भावनेने रात्री कीर्तनात तुकारामांनी आवलीला कर्कशा म्हटले असे चारचौघात म्हणणे बरे दिसत नाही. जे काय असेल ते आपल्या घरी बोलावे असे तिच्या मनाला वाटल्याने कीर्तनातील प्रसंग ती न विसरता आवलीच्या स्वभावाचा कानोसा घेत कथन करताना दिसते. यावरून एक स्त्री दुसऱ्या स्त्रीच्या भावना जाणू शकते हे तिच्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येते.

### इतर व्यक्तिरेखा

'तुकयाची आवली' कादंबरीमध्ये येणारी इतर पात्रे ही वारंवार न येता एखाद्या प्रसंगात येतात तर काही व्यक्तिरेखांचा फक्त नामोल्लेख होतो.

कादंबरीत येणारी लोभस, भक्तांना वेड लावणारी 'विठ्ठल' ही व्यक्तिरेखा कर कटीवर ठैवलेली स्थिर भावमुद्रेची सामर्थ्यशाली दैवत मानवी रूपात व्यक्त करून तुकारामांच्या भल्या-बुऱ्याचा विचार करण्याच्या दृष्टीने योजिले आहे. तर रूक्मिणीची व्यक्तिरेखा विलोभनीय असून ती विठ्ठलाची पत्नी आहे. एक स्त्री म्हणून आवलीच्या परिस्थितीचे समर्थनच करताना व विठ्ठलाच्या लिलया खेळाबद्दल संभ्रमावस्थेत असणारी व्यक्तिरेखा आहे.

तसेच सोपानकाका हे गावातील एक भले गृहस्थ आहेत. तुकाराम बुवा वेदातील ज्ञान आपल्या भजन कीर्तनाच्या माध्यमातून गावाला देतात असा धर्मभास्करांचा रोष येतो. त्यावेळी गावात नेमकी कोणती कुजबूज आहे. हे आवलीला समजावून सांगतात व गावात रहायचे तर गावाप्रमाणे वागावं लागत. विरोधात जाऊन चालत नाही. असा आवलीला सल्ला देताना दिसतात.

सुंदरामावशी ही आवलीच्या आजारपणात आपला शेजारधर्म समजून तिची देखभाल करताना दिसते. तसेच गावातील ब्राह्मण लोक तुकारामांवर नाराज आहेत हे पाहून ती आवलीला सांगते की, तुकारामांनी गावाच्या रामगाड्यात लक्ष घालून गावाशी वैर करू नये, असा सल्ला देताना दिसते.

गावातील गुरव रामेश्वर भटाच्या सूचनेनुसार पोथ्या मागण्यासाठी आवलीकडे येतो व आवलीचे पोथ्या विषयीचे मत धर्मभास्करांना कथन करताना दिसतो. धर्मभास्करानी पाण्यात टाकलेल्या पोथ्या पाण्यातून बाहेर काढण्याचे काम गुरवाचं पारगं करताना दिसते. तर खुद्द रामेश्वरभटाने तुकाराम महाराजांचे पाय धरले हे सोपानकाकाचा बाळू आवलीला सांगताना दिसतो.

कादंबरीत लेखिकेने विठ्ठलाला अप्रत्यक्षरित्या स्वामीजी, शिवाजी महाराज, पंढरीनाथ यादव, विष्णू या नावाने घटना प्रसंगामध्ये चित्रित केले आहे. आवलीचा मुलगा म्हाद्या घरकामात मदत करणारा, तुकारामांना शोधण्यास मदत करणारा आहे. आईच्या आजारपणात कसेतरी घर सांभाळणारी काशी तसेच तिची इतर लहान मुले गंगा, विठोबा व छोटा नारायण यांच्या नामोल्लेख होतो. तसेच तुकारामांचा भाऊ, कान्होजी, सावजी त्यांची पत्नी, तुकारामांचा मुलगा संताजी, शिवाजी महाराजांच्या भेटीतील पंत, साथीदार, शिपाई, आवलीच्या बालमैत्रिणी गोदा, मनू, वत्सला, विश्वस्त पंच मंडळीतील बाळाजी, कृष्णाजी यांचा केवळ नामोल्लेख होताना दिसतो.

**घटनाप्रसंग**

'कादंबरीच्या आशयसूत्रामध्ये घटना प्रसंग आणि व्यक्ती हे घटक परस्परांशी अतून संबंध प्रस्थापीत करून कथासूत्राला अपरिहार्यपणे पुढे पुढे खेचीत नेतात.' घटनां-प्रसंगातून व्यक्तिरेखेचे जीवनदर्शन घडत असते. कादंबरीला गती येण्यासाठी वाचकांच्या मनात कुतूहल निर्माण करणारे प्रसंग परस्परांशी निगडीत असतात.

'तुकयाची आवली' कादंबरीमधील आशय अनेक घटना प्रसंगाना घेऊन पुढे वाटचाल करीत राहतो. कादंबरीत मंजुश्री गोखले यांनी अतिशय प्रभावीपणे घटना प्रसंगाचे चित्रण केले आहे. संत तुकाराम महाराज व आवली या दोन व्यक्तींच्या जीवनात अनेक प्रसंग घडतात. याचे अतिशय भावपूर्ण चित्रण लेखिकेने केले आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रामुख्याने कादंबरीमधील आवलीची संसारातील दयनीय अवस्था, जीवनसंघर्ष, तिची मानसिकता आणि तुकारामांची  विठ्ठलभक्ती यातून स्वार्थ-परमार्थासाठी चालेली दोघांची सोशिकता या सगळ्या प्रसंगाचे वर्णन अतिशय प्रभावी आणि परिणामकारक पद्धतीने केले आहे.

आवली आणि तुकारामांच्या वैयक्तिक जीवनातील घटना-प्रसंग चित्रित करताना तुकारामांच्या आई-वडिलांचा मृत्यू यामुळे आवली आणि तुकाराम यांच्यावर झालेला दु:खाचा आघात ही घटना लेखिकेने समरसून चित्रित केलेली जाणवते. तसेच तुकारामांच्या जीवनात अशा काही घटना घडल्या आहेत की, त्यामुळे तुकाराम आघात होऊन कोसळतात. त्यांचा थोरला भाऊ सावजीचे संसारातून विरक्त होणे, भावजीयचा मृत्यू पाठोपाठ पहिल्या पत्नीचा मृत्यू, मुलाचा मृत्यू या सर्व घटना तुकारामांना हतबल, निराश करून संसारापासून तोडून जाऊन विठ्ठल भक्तीकडे ओढणाऱ्या आहेत.

आवली-तुकारामांना कधी वैयक्तिक तर कधी सामुहिक अशा अकल्पित दु:खद घटना प्रसंगाना सामोरे जावे लागते. महाराष्ट्रात पडलेला महाभयंकर दुष्काळ ही घटना आवली व तुकारामांच्या जीवनात बरीच उलथापालथ करून जाते. या घटना प्रसंगानी आवली-तुकारामांचा जीवन संघर्ष अधोरेखित होतो. आवलीची संसारातील ओढ आणि तुकारामांची विठ्ठलभक्ती यात संघर्ष होताना दिसतो.

लालाजी सावकार वाड्यावर जप्ती आणतो त्या प्रसंगात आवली म्हणते, 'धनी, अहो ऐकताय ना? तो सावकार आपल्याला, आपल्या मुलांना उघड्यावर टाकायला आलाय आपल्या डोक्यावरचं, आपल्या हक्काचं छप्पर काढून घेतोय. तुम्ही त्याला आडवा त्याला थांबवा काहीतीर बोला धनी काही तरी करा.'[१]

या प्रसंगातून आवलीची मुले, संसार यासाठी तळमळ अधिक प्रकर्षाने जाणवते. तर तुकारामांचा विठ्ठलावर ठाम विश्वास आहे, मर्जी आहे. तो सर्व काही व्यवस्थित करील असा विश्वास ते आवलीला देतात. पण आवली तुकारामांना म्हणते, ''अहो धनी काय बाप हायसा की कोण? कोण कुठला पांडुरंग? तो कशाला आमची काळजी घील? हित प्रत्यक्ष पोरांचा बाप पोरांची काळजी करेना आणि तो पांडुरंग कशाला करेल? त्यानं कमरेवरच हात काढले तर

तो काहीतरी करणार? ते काही नाही मी आणि माझी मुलं या वाड्याच्या बाहेर पडणार नाही. आमचा जीव गेला तरी पडणार नाही.'' [१०]

या प्रसंगातून तुकारामांचे स्थितप्रज्ञत्वाच, तटस्थपणाच निश्चल वागणं पाहून आवलीचा समजूतदारपणा, तिची सोशिकता, सहनशीलता थिजून जाते.

कादंबरीत लेखिकेने तुकाराम-आवलीच्या जीवनसंघर्षात विठ्ठलभक्तीवर विजय मिळवणारे तुकाराम आणि संसारात हरत, हतबल झालेली आवली चित्रित केली आहे. वाड्यावर जप्ती येऊन विठ्ठल मंदिरात आल्यानंतर विठ्ठल आपल्याला हसून खिजवत आहे. असा तिचा भास होतो. म्हणून ती म्हणते. 'हास, हास तू मेल्या माझ्या संसाराचा विस्कोट करून तू इथं विटेवर उभा राहून हसतोयस? माझे शाप लागतील तुला. तुझापण विस्कोट होईल. माझ्या भोळ्या नवऱ्याला नादी लावलस तू, त्याच्या सरळ मनावर गारूड केलस तू. तुला काय वाटलं आवली गप्प बसेल? ती बाईमाणूस ती काय करणार? पण मी तुला सोडणार नाही. तुला शेकटानं शेकटून काढल्याबिगर मी राहणार नाही. माझे माझ्या लेकरांचे शाप तुला लागतील. तुझ तळपट होईल. बघच तू. मला आणि माझ्या लेकरांना उघड्यावर यावं लागलं. तुझ्यामुळं माझ्या नवऱ्याच संसारातलं लक्ष उडालं तुझ्यामुळं काळतोंड्या, तुझ्या भक्तांची अशी वणवण आणि भक्तांचा पाठीराखा म्हणून मिरवतोस? लाज वाटत नाही तुला? आत्ताच नाही मी तुझ हे गारूड लहानपणापासून बघत आलेय. पण माझ्यावर तुझी जादू चालायची नाही. मी इथं तुझ्या देवळात राहणार नाही. उघड्यावर राहीन, रस्त्यावर बसून राहिल,पण हित तुझ्या छताखाली राहणार नाही.माझं छत-छप्पर दे नाहीतर तुझं काही खरं नाही.'[११]

अशा प्रकारच्या छोट्यामोठ्या प्रसंगातून आवलीचा विठ्ठलावरचा विश्वास कमी होतो. तर तुकारामांचा अधिक होताना दिसतो. या प्रसंगातून आवली आपला संसार मोडायला विठ्ठलच सर्वस्वी जबाबदार आहे हे सिद्ध करते. आपला नवरा काही केलं तरी विठ्ठलाच्या भक्तीपासून परावृत्त होत नाही म्हणून ती संसाराचा गाडा एकहाती रेटताना अनेक प्रसंगातून दिसून येते. तुकारामांच्या पोथ्या पाण्यात बुडविण्याच्या प्रसंगात ती पोथ्या देत नाही. मात्र तुकाराम आपल्या पोथ्या जड अंतकरणाने रामेश्वर भटाकडे देतात. त्यावेळी ती तुकारामांसह इंद्रायणीकाठी असते. वीस दिवसांनी पोथ्या सापडल्यावर तिला खूप आनंद होतो तिला रेशमी

वस्त्रातील पोथ्यांची ओळख पटते. या प्रसंगातून आवलीची तुकारामांच्या भल्या-बुऱ्या प्रसंगातील भाबडी प्रतिमा चित्रित केली आहे.

आवलीला तुकाराम हवे आहेत. तिचं त्यांच्यावर जिवापाड प्रेम आहे. तुकाराम जेव्हा आपल्याला गेलं पाहिजे तू ही चल असे विनवतात असताना ती केवळ आपली मुले, पोटातील गर्भाखातर नकार देताना दिसते. मात्र तुकारामांचं सिद्धावस्थेला पोहचण त्यांच संसारातील अस्तित्व नसणं ही घटनासहन न झाल्याने ती भ्रमिष्ट होते. तुकारामांच्या शोधासाठी ती विठ्ठलमंदिरात कधीतरी भेटतील या आशेने जाते व मूर्तीमध्ये तुकाराम दिसल्यावर त्यांना दु:खावेगाने साद घालते. आपली व्यथा, जगणं तुकारामांना कथन करते या प्रसंगाने आवलीच्या काळजातलं दु:ख तुकारामांच्या समोर धो-धो वाहतं तसेच वाचकांच्याही दु:खाला पारावर राहत नाही.

अशाप्रकारे प्रस्तुत कादंबरीतून अनेक घटनाप्रसंगाच्या माध्यमातून आवलीच्या व्यक्तिमत्त्वाचे अधिक पैलू लेखिकेने संवेदनशिलतेने टिपलेले दिसतात.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | पाटील, गंगाधर | : | 'आशयसूत्र आणि आशयसूत्रमीमांसा' अनुष्टुब, मार्च-एप्रिल २००२, पृष्ठ. ९ |
| २. | गोखले, मंजुश्री | : | 'तुकयाची आवली' मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती,नोव्हेंबर २००७, पृ. ११९, १२० |
| ३. | गाणोरकर, प्रभाआणि इतर | : | 'वाङ्मयीन संज्ञा, संकल्पना कोश, प्रका. ग. रा. भटकट, फाऊंडेशन, मुंबई' पृ. १४५ |
| ४. | राजाध्याक्ष, विजया (संपा) | : | 'मराठी वाङ्मय कोश', खंड चौथा, समीक्षा संज्ञा महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्र. आ. २००२ पृ. २६२ |
| ५. | गोखले, मंजुश्री | : | 'तुकयाची आवली' मेहता पब्लिशिंग हाऊस, प्र. आ. नोव्हें. २००७, पृ. क्र. १२७ |
| ६. | तत्रैव | : | उ.नि.पृ. क्र. १४९ |
| ७. | तत्रैव | : | उ.नि.पृ. क्र. १४४ |
| ८. | बांदिवडेकर, चंद्रकांत | : | 'मराठी कादंबरीचा इतिहास' मेहता प्रकाशन, पुणे तृ.आ. १९७३, पृ. क्र. ४ |
| ९. | गोखले, मंजुश्री | : | 'तुकयाची आवली' मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे. प्रथमावृत्ती, नोव्हें. २००७ पृ. क्र. ९०, पृ. क्र. ९१ |
| १०. | तत्रैव | : | पृ. क्र. ९१ |
| ११. | तत्रैव | : | पृ. क्र. ९३ |